# निर्देश पत्र
## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( नगरसचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा० वृक्षप्राधिकरण समिती सभा |
| | |
| | दि० ३०/०५/२०१८ |
| | |

प्रकरण क्र. ०२ ते १८

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

②

१८/१५

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २६/०५/२०१४.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- ०२ दिनांक २६/०५/२०१४**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ३०/०५/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२, दि. २६/०५/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ज्ञ. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०२, दि. २६/०५/२०१४ सोबतची विषय पत्रिका
## सभा शुक्रवार दि. ३०/०५/२०१४

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ०२ | दि. १३/१२/२०१३ व दि. २०/१२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज -** |
| ०३ | मा. स्थायी समिती सभा दि.१७/०२/२०१४, ठराव क्र. १४६ व दि. २६/०२/२०१४, ठराव क्र. १५६ मध्ये मूळ गोषवा-या व्यतिरीक्त बाबीबाबत झालेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल. |
| ०४ | भाईंदर (पूर्व) नवघर शाळा इमारतीच्या तळमजल्यावरील वर्ग मतीमंद मुलांना प्रशिक्षण देणा-या "प्रशिक" या संस्थेस भाड्याने उपलब्ध करुन देणे निर्णय घेणे. |
| ०५ | विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे (सार्व. बांधकाम विभाग) |
| ०६ | आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.(पाणी पुरवठा विभाग) |
| ०७ | मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ठेका वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (वाहन विभाग) |
| ०८ | मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्प येथे कचरा हवारी करणे, आगीवर माती पसरविणे आदी कामी भाड्याने पोकलन, जेसीबी, चेनड्रोसर, डंपर, टोरस भाड्याने घेणे व माती टाकणे इ. कामाची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ०९ | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरीता ठेका पध्दतीने स्त्री/पुरुष मजूर पुरवठा करणेकामी वार्षिक निविदेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १० | महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ११७ (बगीचा/उद्यान) येथे Theme Park विकसित करणेकामीच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. |
| ११ | निवीदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १२ | निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| १३ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १४ | आरोग्य साफसफाई बाबत आढावा घेणे. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

**दिनांक :- २६/०५/२०१४.**

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०२, दि.   /   /२०१४ सोबतची विषय पत्रिका**
**सभा शुक्रवार दि.   /   /२०१४**

| प्रकरण क्रमांक | विषय |
| --- | --- |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ०२ | दि. १३/१२/२०१३ व दि. २०/१२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ०३ | मा. स्थायी समिती सभा दि.१७/०२/२०१४, ठराव क्र. १४६ व दि. २६/०२/२०१४, ठराव क्र. १५६ मध्ये मूळ गोषवा-या व्यतिरीक्त बाबीबाबत झालेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल. |
| ०४ | भाईंदर (पूर्व) नवघर शाळा इमारतीच्या तळमजल्यावरील वर्ग मतीमंद मुलांना प्रशिक्षण देणा-या "प्रशिक" या संस्थेस भाड्याने उपलब्ध करुन देणे निर्णय घेणे. |
| ०५ | विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे (सार्व. बांधकाम विभाग) |
| ०६ | आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.(पाणी पुरवठा विभाग) |
| ०७ | मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ठेका वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (वाहन विभाग) |
| ०८ | मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्प येथे कचरा हवारी करणे, आगीवर माती पसरविणे आदी कामी भाड्याने पोकलन, जेसीबी, चेनड्रोसर, डंपर, टोरस भाड्याने घेणे व माती टाकणे इ. कामाची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ०९ | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरीता ठेका पध्दतीने स्त्री/पुरुष मजूर पुरवठा करणेकामी वार्षिक निविदेस मंजूरी मिळणेबाबत. |
| १० | महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ११७ (बगीचा/उद्यान) येथे Theme Park विकसित करणेकामीच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. |
| ११ | निवीदांना मान्यता देणे. (सा बां) |
| १२ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १३ | आरोग्य साफसफाई बाबत आढावा घेणे. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

१४ निविदांना मंजूरी देणेबाबत (पाणी पुरवठा)

**दिनांक :-   /   /२०१४.**

**(हरेश ल. पाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मा. स्थायी समिती सभा

# दि. १३/१२/२०१३

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १३/१२/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १३/१२/२०१३ रोजी सभा सुचना क्र. २० दि. ०९/१२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. शरद केशव पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | सभापती |
| २. | श्री. राजु यशवंत भोईर | सदस्य |
| ३. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्रीम. शर्मिला बगाजी | सदस्या |
| ६. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ७. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| ८. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| ९. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| १०. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ११. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १२. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| १३. | सौ. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १४. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| १५. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| १६. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

ही पहीली सभा माझ्या सभापती कालावधीत होत आहे. सर्व सदस्यांचे हार्दिक अभिनंदन सर्व सचिव, उप-आयुक्त आणि सर्व विभागाचे अधिकारी यांचे सुध्दा अभिनंदन धन्यवाद आणि हि सभा सर्वांनी खेळीमेळीच्या वातावरणात सर्वांच्या सहकार्याने चालावी अशी मी इच्छा ठेवतो आणि सगळ्या अधिकाऱ्यांनी सभेसाठी येणाऱ्या सगळ्या सभेसाठी सहकार्य करावे. अधिकाऱ्यांना सुध्दा आपले सहकार्य असावे अशी सगळ्यांना माझी विनंती आहे सगळ्यांचे परत एकदा हार्दिक धन्यवाद।

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १३/१२/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २०, दि. ०९/१२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

सबसे पहले मै नवयुक्त सभापती मा. शरद पाटील जी का कॉंग्रेस और राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी के तरफ से हार्दिक अभिनंदन करता हूँ और उम्मीद करता हूँ हमे भी सहकार्य दोंगे और ये सभा, सभी सभा पूरे वर्ष अच्छी तरह से चलाओगे ऐसी आपसे अपेक्षा करता हूँ धन्यवाद।

**प्रशांत दळवी :-**

शिवसेना भाजपा बहुजन विकाय आघाडीचे नवनिर्वाचित स्थायी समिती आदरणीय शरद दादा पाटील यांचे या ठिकाणी पहिल्याच मिटींगला उपस्थिती आहे आणि त्यांचे स्थायी समिती सभापती पदावर विराजमान झाल्यामुळे शिवसेना भारतीय जनता पार्टी व बहुजन विकास आघाडी तर्फे मी त्यांचे अभिनंदन करतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३२, दि. ०७/१०/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**राजू भोईर :-**

सचिव साहेब, प्र.क्र. १०२ पान नं. २१ येथे शांती गार्डनचा उल्लेख केलेला आहे. तिथे शांती धाम गार्डन समोरील इलाका अशी दुरुस्ती करुन घेणे.

**प्रशांत दळवी :-**

दि. ०७/१०/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

दुरुस्तीसह ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३२ :-**

दि. ०७/१०/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १२१ :-**

दि. ०७/१०/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३३, त्रैमासिक जमाखर्चाचा आढावा घेणेबाबत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जुलै २०१३ ते सप्टेंबर २०१३ त्रैमासिक जमाखर्च संबंधित विभागाने मान्यतेसाठी आजच्या मा. स्थायी समिती समोर ठेवण्यात आलेला आहे. वस्तुतः ऑक्टोंबर २०१३ ते डिसेंबर २०१३ या तीन महिन्याचा जमाखर्च नमुना नं. २६ प्रमाणे देणे आवश्यक आहे.

तरी लेखा विभागाने आज मा. स्थायी समितीमध्ये दि. १३/१२/२०१३ रोजी दिलेल्या जुलै २०१३ ते सप्टेंबर २०१३ या त्रैमासिक जमाखर्चासह ऑक्टोंबर २०१३ ते डिसेंबर २०१३ या तीन महिन्याचा त्रैमासिक जमाखर्च पुढील मा. स्थायी समितीसमोर सादर करावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १३३ :-**

त्रैमासिक जमाखर्चाचा आढावा घेणेबाबत.

**ठराव क्र. १२२ :-**

जुलै २०१३ ते सप्टेंबर २०१३ त्रैमासिक जमाखर्च संबंधित विभागाने मान्यतेसाठी आजच्या मा. स्थायी समिती समोर ठेवण्यात आलेला आहे. वस्तुतः ऑक्टोंबर २०१३ ते डिसेंबर २०१३ या तीन महिन्याचा जमाखर्च नमुना नं. २६ प्रमाणे देणे आवश्यक आहे.

तरी लेखा विभागाने आज मा. स्थायी समितीमध्ये दि. १३/१२/२०१३ रोजी दिलेल्या जुलै २०१३ ते सप्टेंबर २०१३ या त्रैमासिक जमाखर्चासह ऑक्टोंबर २०१३ ते डिसेंबर २०१३ या तीन महिन्याचा त्रैमासिक जमाखर्च पुढील मा. स्थायी समितीसमोर सादर करावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३४, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, दुभाजक व मैदानामध्ये सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी आलेल्या वार्षिक निविदांना मंजुरी मिळणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी नव्याने विकसित होणारी व जुनी उद्याने दुभाजक व मैदानामध्ये सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी जाहिर निविदा मागविलेल्या आलेल्या होत्या. या निविदामध्ये होणाऱ्या कामाचे डिएसआर रेट मागच्या स्थायी समितीमध्ये सादर करणेबाबत संबंधित विभाग प्रमुखांनी मान्य केले होते. परंतु या कामाचे डिएसआर रेट आजच्या मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर न केल्याने हा विषय पुढील मा. स्थायी सिमितीमध्ये डिएसआर रेटसह फेरसादर करावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

त्या तीन कंपन्या आलेल्या आहेत त्या सिव्हील कंस्ट्रक्शन मधल्या आहेत लॅन्डस्केपिंग मधली एकच कंपनी आहे.

**मा. सभापती :-**

ठीक आहे मॅडम आपण नंतर सविस्तर मागवू या.

**प्रभात पाटील :-**

समिती गटाने केले किंवा विभाग प्रमुख जे असतील त्यांनी विचार करायला पाहिजे कॉम्पीटीशनला आपण काय टाकतो कॉम्पीटीशनला पण त्याच प्रकारचे ठेकेदार किंवा टेंडर्स आले पाहिजेत.

**मा. सभापती :-**

ठिक आहे आपण दिलेले आहे पुढच्या मिटींगला आपण चर्चा करुया आता चर्चा करुन फायदा नाही ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. १३४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, दुभाजक व मैदानामध्ये सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी आलेल्या वार्षिक निविदांना मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी नव्याने विकसित होणारी व जुनी उद्याने दुभाजक व मैदानामध्ये सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी जाहिर निविदा मागविलेल्या आलेल्या होत्या. या निविदामध्ये होणाऱ्या कामाचे डिएसआर रेट मागच्या स्थायी समितीमध्ये सादर करणेबाबत संबंधित विभाग प्रमुखांनी मान्य केले होते. परंतु या कामाचे डिएसआर रेट आजच्या मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर न केल्याने हा विषय पुढील मा. स्थायी सिमितीमध्ये डिएसआर रेटसह फेरसादर करावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- डॉ. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३५, पुर्नविनियोजन पत्रकास मंजुरी मिळणेबाबत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सन २०१३-१४ या वर्षाच्या "क" अर्थसंकल्पात खालील लेखाशिर्षाप्रमाणे तरतूद शिल्लक आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष तपशील | मुळ अनुदान | आजपर्यंतचा खर्च | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १) | **ब) भांडवली खर्च**<br>**अ.क्र. ५)** ५० द ल ली वाढिव पाणी पुरवठा योजना | ८००.०० लक्ष | २९.४६ लक्ष | ७७०.५४ लक्ष |
| २) | **ब) भांडवली खर्च**<br>**अ.क्र. ६)** नविन अतिरीक्त | ३०००.०० लक्ष | ३८१.२२ लक्ष | २६१८.७८ लक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पाणी पुरवठा योजना | | | |

वरील लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद शिल्लक आहे. पाणी पुरवठा विभागातील काही लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद संपल्याने वा अपुरी असल्याने महानगरपालिका क्षेत्रातील काही तातडीने करावयाची कामे प्रलंबित आहेत. नविन जलवाहिनी टाकणे, वितरण व्यवस्था याकरीता पुढीलप्रमाणे १) ५० द.ल.ली. वाढिव पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षातून रू.२१५.०० लक्ष व नविन अतिरक्त पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षातून रू.३२५.०० लक्ष, याप्रमाणे लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध शिल्लक तरतूदीमधून खालील लेखाशिर्षात दर्शविल्यानुसार पुर्नविनियोजन करणेत यावी.

| | |
|---|---|
| १) नविन जलवाहिनी टाकणे | – रू.२००.०० लक्ष |
| २) वितरण व्यवस्था किरकोळ खरेदी दुरूस्ती | – रू.२००.०० लक्ष |
| ३) कुपनलिका व विंधन विहीरी खोदणे | – रू.१५.०० लक्ष |
| ४) टँकर भाडे | – रू.१२५.०० लक्ष |
| | **एकूण रू.५४०.०० लक्ष** |

वरील नमूद केल्याप्रमाणे १) नविन जलवाहिनी टाकणे २) वितरण व्यवस्था किरकोळ खरेदी दुरूस्ती ३) कुपनलिका व विंधन विहीरी खोदणे ४) टँकर भाडे या लेखाशिर्षाकरीता पुर्वविनियोजन करणेस व कनाकिया येथे जलकुंभ बांधणेकरीता रू.५०.०० लक्ष तरतूद **"पाण्याची टाकी / इमारती बांधकाम/ मीटर कार्यशाळा, गोडाऊन"** या लेखाशिर्षाकरीता उपलब्ध शिल्लक नविन अतिरीक्त पाणी पुरवठा योजनेमधून पुर्नविनियोजन करणेस तसेच सन २०१३-१४ या वर्षात उर्वरित जलकुंभ बांधणेच्या खर्चास वाढीव तरतूद करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

पुर्नःनियोजन जो आया है आपने लिया है वो संबंधीत इससे आना चाहीए ना।

**प्रशांत दळवी :-**

उन्होंने दिया, त्यांनीच दिले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

आयुक्त साहेबांनी आपल्याला दिले पाहिजे.

**प्रशांत दळवी :-**

आपण त्या विभागामार्फत घेतलेले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

कुठल्या विभागामार्फत घेतलेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

*जो विभागातला आता ठराव केला त्या विभागाकडून आपण घेतलेला आहे.*

**मा. सभापती :-**

हा प्रशासनाने दिलेला विषय आहे त्यांच्याच डिपार्टमेंट मधलाच त्यांच्याच डिपार्टमेंटमध्ये पुर्नःनियोजन करायचे आहे त्या डिपार्टमेंटने दिले आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

आप लोगोने समय कब दिया है? हम लोगोने चर्चा स्टडी नही ऐसा चलना है क्या?

**प्रभात पाटील :-**

पैशाचा विषय आहे आर्थिक विषय आहे दोन दिवस अगोदर द्यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

आमचा विरोध आहे.

**प्रशांत दळवी :-**

ठराव करा ना.

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब तुम्ही ५ कोटी ४० लाखाची आमच्याकडुन परवानगी मागितली ह्या खात्यातले पैसे त्या खात्यात हे जे हेड आहेत. कुपनलिका व इंधन, विहिरी खोदणे आता आपल्याकडे किती कुपनलिका आहेत व चालु किती आहेत कुपनलिका किती खोदणार आहात व इंधन विहिरी किती खोदणार आहेत याची माहिती द्या.

**सुरेश वाकोडे :-**

सभापतीच्या परवानगीने बोलतो पानपट्टे साहेब बोलले होते आपल्या पाणीपुरवठ्यामध्ये महत्वाच्या काही बाबी आहेत. जलवाहीनी बदलणे, जलवाहीनीची जलवाहिनी काही महत्वाची आपल्या यामुळे ही तरतुदीसाठी हा प्रस्ताव आयुक्तांमार्फत पाठविलेली आहे. आता याच्यामध्ये कुपनलिका, इंधन विहिरी, कुपनलिका आपल्याकडे ६० आहेत तर इंधन विहिरी ८६ आहेत याची आपण देखभाल दुरुस्ती करतो त्याची तरतुद आता संपलेली आहे आता प्रोव्हीजन मार्च मध्ये आवश्यकता असते मार्चमध्ये ह्या गोष्टी हाती घेतल्या काम तातडीने व्यवस्थित होतात नाहीतर एप्रिल मे मध्ये काढले तर ते होत नाही.

**रोहिदास पाटील :-**

कुपनलिका किती आहेत? त्यातल्या किती चालू आहेत व किती खोदु इच्छिता तुम्ही तसा तुम्ही सर्वे घेतला आहे का की, फक्त मंजुरी घेता इंधन विहीरी किती आहेत त्यातल्या किती चालू आहेत व किती नविन बनविणार आहेत हे तीन ते तीन प्रश्न आहेत.

**वंदना पाटील :-**

आम्हाला हे तेच पाहिजे होतं म्हणुन आम्ही ठरावाला तुम्ही व्यवस्थित दिले असते तर ठरावाला विरोध करायची जरुरत नव्हती.

**मा. सभापती :-**

तुम्ही पुढच्या मिटींगला माहिती आणा.

**प्रकरण क्र. १३५ :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२४ :-**

सन २०१३-१४ या वर्षाच्या "क" अर्थसंकल्पात खालील लेखाशिर्षाप्रमाणे तरतूद शिल्लक आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष तपशील | मुळ अनुदान | आजपर्यंतचा खर्च | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १) | **ब) भांडवली खर्च**<br>**अ.क्र. ५)** ५० द ल ली वाढिव पाणी पुरवठा योजना | ८००.०० लक्ष | २९.४६ लक्ष | ७७०.५४ लक्ष |
| २) | **ब) भांडवली खर्च**<br>**अ.क्र. ६)** नविन अतिरीक्त पाणी पुरवठा योजना | ३०००.०० लक्ष | ३८१.२२ लक्ष | २६१८.७८ लक्ष |

वरील लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद शिल्लक आहे. पाणी पुरवठा विभागातील काही लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद संपल्याने वा अपुरी असल्याने महानगरपालिका क्षेत्रातील काही तातडीने करावयाची कामे प्रलंबित आहेत. नविन जलवाहिनी टाकणे, वितरण व्यवस्था याकरीता पुढीलप्रमाणे १) ५० द.ल.ली. वाढिव पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षातून रू.२१५.०० लक्ष व नविन अतिरक्त पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षातून रू.३२५.०० लक्ष, याप्रमाणे लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध शिल्लक तरतूदीमधून खालील लेखाशिर्षात दर्शविल्यानुसार पुर्नविनियोजन करणेत यावी.

| | |
|---|---|
| ५) नविन जलवाहिनी टाकणे | – रू.२००.०० लक्ष |
| ६) वितरण व्यवस्था किरकोळ खरेदी दुरूस्ती | – रू.२००.०० लक्ष |
| ७) कुपनलिका व विंधन विहीरी खोदणे | – रू.१५.०० लक्ष |
| ८) टँकर भाडे | – रू.१२५.०० लक्ष |
| | **एकूण रू.५४०.०० लक्ष** |

वरील नमूद केल्याप्रमाणे १) नविन जलवाहिनी टाकणे २) वितरण व्यवस्था किरकोळ खरेदी दुरूस्ती ३) कुपनलिका व विंधन विहीरी खोदणे ४) टँकर भाडे या लेखाशिर्षाकरीता पुर्वविनियोजन करणेस व कनाकिया येथे जलकुंभ बांधणेकरीता रू.५०.०० लक्ष तरतूद **"पाण्याची टाकी / इमारती बांधकाम/ मीटर कार्यशाळा, गोडाऊन"** या लेखाशिर्षाकरीता उपलब्ध शिल्लक नविन अतिरीक्त पाणी पुरवठा योजनेमधून पुर्नविनियोजन करणेस तसेच सन २०१३-१४ या वर्षात उर्वरित जलकुंभ बांधणेच्या खर्चास वाढीव तरतूद करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३६, बाजार वसुलीस दिलेल्या मुदतवाढीबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

महानगरपालिका हद्दीतील फेरवाला फळ, भाजी विक्रेत्यांकडून प्रतीवर्षी बाजार फी वसुली कामी ठेकेदार नेमण्यात येत असतो. सन २०१२-१३ करीता पालिका प्रशासनाकडून वृत्तपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करुन ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव करण्यात आले होते.

याप्रमाणे भाईंदर (पू.), भाईंदर (प.), मिरारोड ते चेणा उत्तन विभागाकरीता सन २०१२-१३ या १२ महिन्यांच्या कालावधीसाठी बार फी वसुलीकरीता अभिकर्ता नेमणेकामी देकाराची रक्कम निश्चित करुन बाजार ठेकेदार नेमण्यात आलेले होते. या बाजार लिलावाच्या बोली रक्कम स्विकारणेस सदर विषय मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०१/२०१३, प्रकरण क्र. १४ ने ठेवण्यात आलेला होता. सदर विषयाबाबत बाजार फेरिवाल्यांकडून बाजार फी वसुल करणाऱ्या लिलाव पध्दतीने काढण्यात आलेल्या निविदांच्या मंजूरीचा विषय पुढील मा. स्थायी समितीमध्ये घेण्यात यावा असा ठराव पारीत झालेला होता. परंतु सदर सन २०१२-१३ या वर्षातील निविदांच्या मंजूरीचा विषय आजपर्यंत सभेमध्ये ठेवण्यात आलेला नाही. तरी हा विषय प्रशासनाने त्वरीत मा. स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी ठेवून पुढील सन २०१३-१४ करीता नविन लिलाव प्रक्रिया करताना मा. सर्वोच्च न्यायालय यांचे दि. १३/०९/२०१३ चे आदेश व राज्य शासनाने दि. २१/१०/२०१३ चे आदेश यांचे तंतोतंत पालन करुन कार्यवाही करावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**वंदना पाटील :-**

गोषवारे नाहीत आणि तो विषय इथे मांडला जातो का असे चालते का?

**मा. सभापती :-**

मॅडम आपला प्रश्न उचीत आहे आपण इथे मंजुरीसाठी परत स्थायी समितीपुढे येणार आहे विषय एवढे वर्षे झालेले आहे मुदतवाढ होत चाललेले आहे त्याच्यामुळे त्याचा फेरलिलाव व्हावा म्हणुन तो आपण ठराव मांडलेला आहे आणि तो प्रस्ताव आपल्याकडे परत येणार आहे.

**वंदना पाटील :-**

येणार आहे ना?

**मा. सभापती :-**

गोषवारा येणार आहे.

**प्रशांत दळवी :-**

फेरनिविदा येईल त्याच्याबरोबर गोषवारा पाठविला जाईल.

**प्रभात पाटील :-**

आज काय पोजीशन आहे? कुणाकडे तो ठेका आहे? त्याला किती वेळा मुदतवाढ दिली आहे त्याच्याविषयी माहिती देऊ द्या ना?

**मा. सभापती :-**

हा ठिक आहे माहिती देतील तुम्हाला माहिती घ्या ना तुम्ही आपण ते फेरनिविदा करतो का? आजपर्यंत मुदतवाढ चाललेली आहे आणि गेल्या स्टँडींगमध्ये हा ठराव कॉंग्रेस पक्षातर्फे मांडला होता तो वेगळा होता आणि सेम ठराव आम्ही पहिला मांडला होता आणि त्याच ठरावाची जरुरत आहे.

**प्रशांत दळवी :-**

सभापती महोदय माझी विनंती आहे तुम्हाला हा जो ठराव आपण मांडला आहे या ठरावाची अंमजबजावणी व्हावी रितसर ठराव पुढील स्थायी समिती पुढे सादर करावा.

**मा. सभापती :-**

मा. सदस्य हंसुकुमार पांडे आपण हा ठराव मांडलेला आहे ठराव मंजुर करण्यात येत आहे आणि दुसरी गोष्ट त्याची अंमलबजावणी करुन परत स्टँडींग पुढे येणार आहे.

**दिपक सावंत :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो मिरा भाईंदरमहानगरपालिकेचा बाजार ठेका आहे. सन २०१२-१३ चा हा मिरा भाईंदर क्षेत्रातील ४ प्रभाग एरियामध्ये ४ विभागामध्ये अनुक्रमे भाईंदर पूर्वेचा श्री. विजय गजाधर सोमानी व भाईंदर पश्चिम सिमरन इंटरप्राईजेस मिरारोड ते चेणा राजेश बेलानी आणि मुर्धा ते उत्तन मे. सिमरन इंटरप्राईजेस.

**प्रभात पाटील :-**

यांची मुदत किती ते किती होती?

**दिपक सावंत :-**

यांचा ठेका ऑक्टोबर २०१२ मध्ये दिला होता एका वर्षासाठी १३ पर्यंत होती त्याच दरम्यान केंद्र शासनाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेश आले की, फेरीवाला राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची ४ महिन्यामध्ये अंमलबजावणी करा त्याप्रमाणे ऑक्टोबर मध्ये शासनाने सुध्दा आदेश पारित केले की ह्याची अंमलबजावणी करा. तर आपण हे टेंडरींग प्रोसीस केली होती पण आदेश आल्यामुळे आपण परत शासनाला किंवा हे आदेश आणि आला जो ठेका चालू आहे या आदेशामध्ये शहरामध्ये शहर फेरीवाला समिती स्थापन करायची महापौर तिथे अध्यक्ष असतील आणि स्टॅच्युटरी पदे आहेत त्याचे ते सदस्य असतील शहरातील डीसीपी असतील पी आय असतील आणि फेरीवाला जे आहेत त्यांचे प्रतिनीधी अशी शहर फेरीवाला समिती राहील प्रभाग स्तरावरती प्रभाग फेरीवाला समिती राहील त्या प्रभाग समितीचे अध्यक्ष प्रभागाचे सभापती असतील आणि सचिव म्हणुन वॉर्ड ऑफीसर असतील ह्या कमिट्या स्थापन करावयाच्या आहेत आणि संपूर्ण शहरातील फेरीवाला ना फेरीवाला क्षेत्र आयडेंटीफाय करायचा आहे आयडेंटीफाय करुन जी प्रभाग फेरीवाला समिती आहे त्यांना त्याला मान्यता द्यायची आहे त्या प्रभाग समितीने मान्यता दिल्यानंतर तो विषय शहर फेरीवाला समितीकडे येईल आणि शहर फेरीवाला समितीने मान्यता द्यायची हा विषय आहे त्याची तीन महिन्यातुन एकदा बैठक होणे अपेक्षित आहे जे शहरामधील फेरीवाल्यांसाठी सर्वेक्षण करणे, सर्वेक्षण करुन त्यांना लायसेन्स देणे ही सुध्दा कार्यवाही चार महिन्यामध्ये करायची आहे असे आदेश झाले होते.

**हंसुकुमार पांडे :-**

काय सर्वेक्षण करणार?

**दिपक सावंत :-**

संपूर्ण शहरातील जे फेरीवाले आहेत ते कुठे कुठे बसतात त्यांचे सर्वेक्षण करणार सुप्रिम कोर्टाच्या आदेशाने आणि त्यांना लायसेन्स आपण देणार आहे व्यवसाय करण्यासाठी.

**हंसुकुमार पांडे :-**

किती वर्षापासुन बसतो त्यांना लायसेन्स देणार तुम्ही.

**दिपक सावंत :-**

ते ठरवायचे आहे प्रभाग समिती ठरवतील आणि कुठे बसायचे आहे हे सुध्दा प्रभाग समिती ठरविणार सभापती.

**मुन्ना सिंग :-**

फेरीवाले झोन मे देंगे ना.

**दिपक सावंत :-**

तुम्ही ठरविणार ते आता कुठे कुठे बसणार वगैरे आणि त्यांनी मंजुरी दिल्यानंतर□.

**रोहिदास पाटील :-**

अगोदर कुणाला लायसेन्स दिलेली आहे का?

**दिपक सावंत :-**

लायसेन्स अगोदर कुणाला दिलेली नाही?

**रोहिदास पाटील :-**

आपल्या महापालिकेच्या वतीने कोणत्याही फेरीवाल्याकडे..

**दिपक सावंत :-**

दिलेली नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपले आयडेंन्टी कार्ड व लायसेन्स दिलेले आहे काय?

**दिपक सावंत :-**

नाही हे धोरणानुसार आपण करणार आहोत.

**हंसुकुमार पांडे :-**

ऐवढे कंजेस्टेड सर्व रोड झालेले आम्ही प्रभाग समितीमध्ये पण बोललो आहे ये रोड पे फेरीवाला मत बिठाओ यहा बसेस जाती है। इतने छोटे छोटे रोड है ट्रॅफिक फुल जाम है प्रभाग समिती मे सुनवाई नही होती।

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब थॅन्क यु तुम्ही परवानगी दिल्यामुळे माहिती मिळाली.

**मा. सभापती :-**

प्रभात ताई मॅडम, आपण कुठल्याही विषयाबद्दल कधीही ज्या सर्व सदस्यांना माहिती पाहिजे ते मागण्याचा अधिकार आपण ठेवायला लागेल आणि सगळ्यांना मिळत राहील त्याच्यामुळे आपण सगळ्या सदस्यांनी जे योग्य असेल ते विचारा जे योग्य असेल ते उलट अधिकारी वर्ग आपल्याला देत राहतील.

**प्रकरण क्र. १३६ :-**

बाजार वसुलीस दिलेल्या मुदतवाढीबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. १२५ :-**

महानगरपालिका हद्दीतील फेरवाला फळ, भाजी विक्रेत्यांकडून प्रतीवर्षी बाजार फी वसुली कामी ठेकेदार नेमण्यात येत असतो. सन २०१२-१३ करीता पालिका प्रशासनाकडून वृत्तपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करुन ई-ऑक्शन पध्दतीने लिलाव करण्यात आले होते.

याप्रमाणे भाईंदर (पू.), भाईंदर (प.), मिरारोड ते चेणा उत्तन विभागाकरीता सन २०१२-१३ या १२ महिन्यांच्या कालावधीसाठी बार फी वसुलीकरीता अभिकर्ता नेमणेकामी देकाराची रक्कम निश्चित करुन बाजार ठेकेदार नेमण्यात आलेले होते. या बाजार लिलावाच्या बोली रक्कम स्विकारणेस सदर विषय मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०१/२०१३, प्रकरण क्र. १४ ने ठेवण्यात आलेला होता. सदर विषयाबाबत बाजार फेरिवाल्यांकडून बाजार फी वसुल करणाऱ्या लिलाव पध्दतीने काढण्यात आलेल्या निविदांच्या मंजूरीचा विषय पुढील मा. स्थायी समितीमध्ये घेण्यात यावा असा ठराव पारीत झालेला होता. परंतु सदर सन २०१२-१३ या वर्षातील निविदांच्या मंजूरीचा विषय आजपर्यंत सभेमध्ये ठेवण्यात आलेला नाही. तरी हा विषय प्रशासनाने त्वरीत मा. स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी ठेवून पुढील सन २०१३-१४ करीता नविन लिलाव प्रक्रिया करताना मा. सर्वोच्च न्यायालय यांचे दि. १३/०९/२०१३ चे आदेश व राज्य शासनाने दि. २१/१०/२०१३ चे आदेश यांचे तंतोतंत पालन करुन कार्यवाही करावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- डॉ. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३७, गाड्या भाड्याने घेणेबाबत मुदतवाढ दिलेल्या निवेदेबाबत विचार विनियम करुन निर्णय घेणेबाबत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाहन विभागात आवश्यकतेनुसार वाहन वाहनचालकासह व इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेणेचे ठेक्याची मुदत सप्टेंबर २०१२ मध्ये संपलेली होती. दरम्यानच्या कालावधीत सार्वत्रिक निवडणूक असल्याने प्रशासनास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी घेता आली नाही. या नंतर या कामाच्या निविदा मंजुरीचा विषय दि. १५/०१/२०१३ च्या मा. महासभेमध्ये ठेवण्यात आला होता. सदर विषय मा. महासभेमध्ये मंजुर न झाल्याने त्याच ठेकेदारास नविन निविदेस मंजुरी मिळेपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

वार्षिक निविदेचा कालावधी दि. २३/०९/२०११ ते दि. २२/०९/२०१२ पर्यंत होती. या कामास मुदतवाढ दिल्यानंतर संबंधित विभागाने या कामाच्या फेरनिविदा मा. महासभेमध्ये ठेवणे आवश्यक होते. परंतु अश्या प्रकारची कोणतीही कार्यवाही वाहन विभागाकडून कार्यवाही मागील १२ महिने झालेली नाही. तसेच ठराव क्र. ४२ प्रमाणे रू. ६०.०० लाखास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी दिलेली होती. त्यापेक्षाही जास्त खर्च संबंधित विभागाने केलेला आहे.

वाहन विभागाने वेळेत निविदा न मागविणे व आर्थिक व प्रशासकिय मंजुर केलेल्या रकमेपेक्षा जास्त खर्च संबंधित विभागाने केला असल्याने या विभागातील सर्व अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्या मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिता पाटील :-**

सभापती साहेब ह्याच्यापण गोषवारा दिला नाही.

**मा. सभापती :-**

मॅडम हे सर्व मुदतवाढ दिलेले आहे.

**अनिता पाटील :-**

परत तो विषय आपण घेणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

आपण कार्यवाहीची मागणी केलेली कामकाज तर चाललं पाहिजे गाड्या आहेत तर गाड्या चालल्या पाहिजेत माझी सुचना अशी राहील मिरा भाईंदर महापालिका विविध विभागाकरीता वाहने वाहन चालकासह इंधनासह संपूर्ण सेवा भाड्याने घेण्याकरीता तीन वर्षाच्या आतील जुन्या वाहनाकरीता १ वर्षाच्या मुदतीसाठी व नविन वाहनाकरीता तीन वर्षाच्या मुदतीकरीता ठेका पध्दतीने वाहने पुरवठा करणेकामे तात्काळ निविदा मागविण्यात याव्या तसेच सदर कामाकरीता आवश्यक तरतुद येत्या सुधारीत अर्थ संकल्पात उपलब्ध करुन घेण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**अश्विन कासोदरीया :-**

माझे अनुमोदन आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उप-आयुक्त ) :-**

सभापतीच्या परवानगीने बोलतो मा. महासभेची परवानगी घेतली होती. ३१/१०/२०१२ ला आपण महासभेची परवानगी घेतल्यानंतर आर्थिक प्रशासनाची मंजुरी घेतल्यानंतर आपण तीन वेळा निविदा ही सुविधा काढल्या प्रशासनाने त्यावर कुठल्याही प्रकारची दिरंगाई केली नाही ही चुकीची बाब मी निर्दशनास आणुन देतो सर्वांना........

**रोहिदास पाटील :-**

चुकीची बाब निर्दशनास आणली आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सुचनेसह मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३७ :-**

गाड्या भाड्याने घेणेबाबत मुदतवाढ दिलेल्या निवेदेबाबत विचार विनियम करुन निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. १२६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाहन विभागात आवश्यकतेनुसार वाहन वाहनचालकासह व इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेणेचे ठेक्याची मुदत सप्टेंबर २०१२ मध्ये संपलेली होती. दरम्यानच्या कालावधीत सार्वत्रिक निवडणूक असल्याने प्रशासनास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी घेता आली नाही. या नंतर या कामाच्या निविदा मंजुरीचा विषय दि. १५/०१/२०१३ च्या मा. महासभेमध्ये ठेवण्यात आला होता. सदर विषय मा. महासभेमध्ये मंजुर न झाल्याने त्याच ठेकेदारास नविन निविदेस मंजुरी मिळेपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

वार्षिक निविदेचा कालावधी दि. २३/०९/२०११ ते दि. २२/०९/२०१२ पर्यंत होती. या कामास मुदतवाढ दिल्यानंतर संबंधित विभागाने या कामाच्या फेरनिविदा मा. महासभेमध्ये ठेवणे आवश्यक होते. परंतु अश्या प्रकारची कोणतीही कार्यवाही वाहन विभागाकडून कार्यवाही मागील १२ महिने झालेली नाही. तसेच ठराव क्र. ४२ प्रमाणे रू. ६०.०० लाखास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी दिलेली होती. त्यापेक्षाही जास्त खर्च संबंधित विभागाने केलेला आहे.

वाहन विभागाने वेळेत निविदा न मागविणे व आर्थिक व प्रशासकिय मंजुर केलेल्या रकमेपेक्षा जास्त खर्च संबंधित विभागाने केला असल्याने या विभागातील सर्व अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्या मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन**    **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. रोहिदास पाटील व अनुमोदक अश्विन कासोदरीया ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागाकरीता वाहने वाहनचालकासह (इंधनासह) संपूर्ण सेवा भाड्याने घेणेकरीता ३ वर्षाच्या आतील जुन्या वाहनाकरीता एक वर्षाच्या मुदतीसाठी व नवीन वाहनाकरीता ३ वर्षे मुदतीकरीता ठेका पध्दतीने वाहने पुरवठा करणे कामी तात्काळ निविदा मागविण्यात याव्यात. तसेच सदर कामाकरीता लागणारी आवश्यक तरतुद येत्या सुधारीत अर्थसंकल्पात उपलब्ध करुन घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शर्मिला बगाजी :-**

सभापती साहेब अधिकाऱ्यांकडुन एलबीटी विषयी माहिती पाहिजे होती. एलबीटी महासभेत बहुतेक ताईने पण विषय काढला होता की, साडे तीन टक्के जो एलबीटी झाला आहे त्याच्याविषयी माहिती पाहीजे होती महासभेत ठराव न झाले असताना देखील आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेतच हा फक्त एलबीटी वाढविलेला आहे बाकी महानगरपालिकेत वाढविलेला नाही त्याच्याविषयी थोडी माहिती मिळाली तर बरे होईल.

**मा. सभापती :-**

सदस्यांना माहिती द्या.

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो आपण अतिशय संवेदनशील विषय उपस्थित केल्याबद्दल मी आपला आभारी आहे. प्रशासनाच्या वतीने मी आपणाला मुलभुत पार्श्वभुमी का सांगतो? एलबीटीची काय माहिती नाही कारण ह्या १५ दिवसापासुन एलबीटीच्या दराबद्दल विविध स्तरामधुन प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. ह्याचं कारण मला सांगता येणार नाही. मुलभुत तरतुद एलबीटी अशी आहे स्थानिक संस्था कराचे दर कायद्यातील तरतुद सांगतो स्थानिक संस्था कराचे दर महापालिकेचे आयुक्त प्रस्थावित करतील शासनाकडे आणि शासन त्यास मंजुरी देईल त्याच्यामध्ये महासभेची मंजुरी घ्यायची कुठे तरतुद नाही कायद्यापाशी का तरतुद आहे ह्याचे विश्लेषण मी करणार नाही २०१० साली मा. तत्कालीन आयुक्त यांनी दर प्रस्थावित शासनाला केले ते दर शासनाने गॅझेटमध्ये प्रसिध्द करुन मंजुर करण्यात आले महापालिकेकडुन ते दर मंजुर किंवा ठरविण्यात आले नव्हते तिसरा भाग आहे. कायद्यात तरतुद आहे २० फेब्रुवारीपर्यंत करामध्ये आणि दरामध्ये बदल करायचे असतील दरवर्षी ते महापालिका आयुक्त ज्या कराच्या आणि दराच्या बाबतीत दर ठरविण्याचे अधिकार महापालिकेचे आहे ते २० फेब्रुवारी पर्यंतच्या अगोदर प्रस्थावित करुन ते महापालिकेने निश्चित करायचे आहे आता २०१३ मध्ये मात्र अनन्य साधारण परिस्थीतीमुळे महाराष्ट्र स्तरावर सर्व महापालिका नागरीक क्षेत्रामध्ये व्यापारांचे आंदोलन झाले आणि २०१० मध्ये जे दर सुची जी व्यापक स्वरुपाची होती १००० ते १२०० पानांची सुची होती त्या दरसुची मध्ये बाब निहाय प्रकरण निहाय आणि बाब निहाय दर होते महाराष्ट्र व्यापारी संघटनेचे कंटरेशन त्यांच्या मागणीनुसार शासनाने असा धोरणात्मक निर्णय घेतला ही विस्तारण आणि व्यापरक स्वरुपाची जी दरसुची आहे ती संक्षिप्त स्वरुपाची करायची आणि ती फक्त आता ३० ते ३५ पानांची पूर्वी प्रकरण निहाय बाब निहाय एलबीटीचे दर होते आता बाब निहाय दर राहीलेले नाहीत आता गटनिहाय आणि वस्तुच्या स्वरुपावर फक्त कॅटेगरीवाईज गट केलेले आहेत. पूर्वीचे बाब निहाय प्रत्येक वस्तु मी एक उदाहरण सांगतो आपणाला थोडे विस्तारीत सांगतो कारण त्याचे पुढील प्रश्न उपस्थित होणार नाहीत पूर्वी दुध, दही, पनीर, लोणी याच्यावर वेगवेगळे दर आकारण्याची तरतुद होती आता कसे केलेले आहे दुध वदुधापासुन बनविण्यात येणारे पदार्थ किंवा खाद्यपदार्थ मग त्याच्यात सर्व आले मिठाई आले, बनविलेले पदार्थ आले अशाप्रकारे संक्षिप्त केलेली आहे पूर्वी शासनाने जे दर ठरवायचे ते अधिकार किंवा मंजुर करायचे अधिकार होते ती बाब निहाय होती आता गटनिहाय केलेल आहे शासनाने एप्रिल मे मध्ये झालेल्या त्या आंदोलनाच्या पार्श्वभुमीकडुन सर्व महापालिकेला निर्देश देण्यात आले तुम्ही पूर्वीचे जे दरपत्रक आहेत त्याच्याऐवजी सर्व महापालिकेतले दरसुची सामुहीक ही समाईक असावी आणि दुसरे त्याच्यामध्ये एक केले प्रत्येक गटातले कमान आणि किमान दर शासनाने ठरवून दिले प्रत्येक प्रकरणातील गटातील कमाल आणि किमान दर ठरवून दिले त्यानुसार महापालिका आयुक्त साहेबांनी जो शासनाला प्रस्ताव पाठविला हा प्रस्ताव पाठविताना पूर्वीचे दर आणि शासनाने कमाल आणि किमाल जे आता सुधारीत दर ठरवून दिले आहेत त्याच्यामध्ये बसून कमाल किमालीमध्ये ज्याठिकाणी कमाल आणि किमान दराचा दर निश्चित करताना तो जर आपला पूर्वीचा दर हा कमाल मर्यादेपेक्षा जास्त असेल तर तो तिथे कमी झालेला आहे. पूर्वी आपला दर हा किमान दरापेक्षा कमी असल्यामुळे तो पुढे किमान दरावर आणून ठेवल्यामुळे त्याठिकाणी दरात वाढ झालेली आहे. तर आपल्याकडे साधारणतः अशा फक्त एका बाबीचा दर वाढलेला नाही किंवा एका बाबीचा दर कमी झालेला नाही तर आपल्याकडे ३८ बाबींचे दर कमी झालेले आहेत. ३८ गटातल्या बाबींचे वस्तुचे दर एलबीटीचे दर पूर्वीपेक्षा कमी झालेत आणि ३२ ते ३४ गटाचे दर वाढलेले आहेत हे सुधारणा स्ट्रक्चरमुळे हा एलबीटी दराचा बाबीचा आणि स्ट्रक्चर हे चेंज केल्यामुळे ही अशी वस्तुस्थिती आहे त्याचे विवरणपत्र आपल्याकडे आहे आता इतर नगरपालिकेतले दर आणि हे तुलना करुन त्याची तुलना केलेली आह ह्याबाबत आपण

**रोहिदास पाटील :-**

ह्या दराची अंमलबजावणी चालू झाली का नाही?

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

सप्टेंबर पासुन चालू झालेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

सप्टेंबर पासुन चालु झालेली आहे. आम्हाला माहिती द्यावयास असे तुम्हाला वाटले नाही संबंधीतांना जी माहिती मी व्यापारी आम्ही सोसायटी चालवतो किंवा सोसायटी चालवतो तो सोसायटीचा सदस्य आहे कधी कोणाला सोसायटीचा चेअरमन सेक्रेटरीला व्यवस्थापकाला विचारतो हे कधी झाले जेव्हा तो सदस्य त्यांना विचारतो तेव्हा तो म्हणतो वाढलं तेव्हा ते सदस्य आम्हाला विचारतो आम्ही सांगतो आम्हाला माहित नाही.

**प्रभात पाटील :-**

आपल्या शहरामध्ये हे तीन दिवसापासून चालू आहे ते म्हणतात सप्टेंबर आपल्याकडे पेट्रोल...........

**मा. सभापती :-**

सप्टेंबर तुम्ही तिथे माहिती पाठविली त्यांना असे माझ्या माहितीप्रमाणे आहे आणि रेट आता वाढलेले आहेत.

**प्रभात पाटील :-**

आता तीन दिवस झालेले आहेत दर वाढलेत.

**रोहिदास पाटील :-**

ही इफेक्ट कधी आहे काय तारीख आहे त्याच.............

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

मला वस्तु स्थिती सांगू द्या आपण शासनानं प्रस्ताव मागविल्यानंतर एप्रिल मे मध्ये आंदोलन ज्यावेळी झाले त्यावेळी प्रस्ताव पाठविला जुलै ऑगस्टला त्याला मंजुरी दिली शासनाने ६ सप्टेंबर २०१३ सहा का दहा सप्टेंबर तारीख आता नक्की सांगु शकणार नाही सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात ते गॅझेट प्रसिध्द झाले आणि सप्टेंबरपासुन आपण त्याला व्यापक प्रसिध्दी दिली व्यापारी संघटना आहे त्यांना सर्व व्यापारी संघटनेला लेखी कळविले स्थानिक वर्तमान पत्रामध्ये त्याला प्रसिध्दी दिली त्याच्यामध्ये एवढेच आहे आपण तुम्ही जे म्हणाल वैयक्तीक रित्या आपण कुणाला माहिती दिलेली नाही किंवा तसा प्रश्न उद्‌भवला नव्हता.

**शर्मिला बगाजी :-**

मला एकच प्रश्न विचारायचा आहे सर म्हणजे आपणच सुचना दिलेली का? जशी आता आपण माहिती दिली ती शासनाकडुन आपला प्रस्तावित होत आपल्याला एलबीटी वाढवायचे आपल्या पालिकेतून शासनाकडे माहिती गेली का नंतरच वाढवला?

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

शासनाने सुधारीत प्रस्ताव मागितला होता.

**प्रभात पाटील :-**

तुमच्या म्हणण्यामध्ये एक गोष्ट आली की सर्व महानगरपालिकेमध्ये तुम्ही सामाईक दर केले बरोबर आहे शासनाने केलेत तुम्ही नाही केले मग मिरा भाईंदरमध्ये पेट्रोल, डिझेलचे दर वाढलेत, वसई विरारला नाही वाढलेत तर मिरा भाईंदरमध्येच का वाढलेत. नवी मुंबई, ठाणे येथे का नाही दर वाढलेत? आपल्यास महानगरपालिकेत वाढलेत?

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

मी दुसऱ्या महानगरपालिकेतील दर का वाढला नाही शासनाने त्यांचा दर कमी का मंजूर केला?

**रोहिदास पाटील :-**

माहिती घेऊन द्या ना.

**अनिता पाटील :-**

तुम्हाला पण घाई एवढी नको होती ना.

**प्रभात पाटील :-**

आमच्या शहरातले लोक एवढी धनाढ्य आहेत का? दर भरायला

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही घ्या शासनाकडुन माहिती का वाढवलं म्हणुन व्यापाराला मारायला बसलात का तुम्ही इथे?

**रोहिदास पाटील :-**

तुमच्यावर वैयक्तीक आरोप करत नाही. ही माहिती आहे, प्रशासकीय माहिती आहे, शासकीय माहिती आहे.

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

बरेचशा नगरपालिकेमधले दर काही दर किमान दरापेक्षा सुध्दा शासनाने मंजुर केलेले आहेत किमान दर शासनाने निश्चित केलेले आहे. त्या गटातील दर किती असावेत याच्यापेक्षा कमी दर इतर नगरपालिकेपेक्षा मंजुर केलेले आहेत बरेचशे ॲटमचे दर............

**प्रभात पाटील :-**

आपला दर जास्त होता का असे म्हणायचे का तुम्हाला.

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

नाही ना.

**प्रभात पाटील :-**

आपल्यापेक्षा दर कमी केलेत आपण का दर जास्त द्यायला बरोबर आहे का बरोबर नाही आपण ..

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

आता पेट्रोलचा विषय चालला म्हणुन सांगतो शासनाने त्या गटाचे दर साडे तीन ते पाच टक्के ठरविले आणि आपण शासनाला तीन टक्के प्रस्तावित केलेला आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

ढगे साहेब फक्त मिरा भाईंदरला का वाढवून घेतला आम्ही ते विचारतो तुम्हाला वसई विरार कुठे .

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

आपण वाढविलेले नाही.

**अनिता पाटील :-**

तुम्ही एवढी घाई का दाखविली का लगेच वाढवायला पाहिजे?

**हंसुकुमार पांडे :-**

एलबीटी एकच उत्पन्न दिसते का तुम्हाला?

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

याच्यामध्ये सभापती साहेब एकाच महापालिका नाहीए सर्व महापालिकेची दरसुची शासनाने मंजुर केलेली आहे.

**मा. सभापती :-**

ढगे साहेब एक गोष्ट ऐका आपण सगळ्या महापालिकेची रेट घ्या आणि त्याचे ताळमेळ जुळवा ना इथे ढगे साहेब तुम्ही असे बोलू नका माझे काम आहे का? कारण आपल्याला जेव्हा गरज असते अधिकाऱ्यांना तेव्हा आपण सगळ्या महापालिकेच घेऊन येतो त्याच्यामुळे हे पण घेऊन या.

**प्रशांत दळवी :-**

याची रितसर माहिती पुढच्या स्थायी समिती मध्ये ठेवण्यात यावी.

**हंसुकुमार पांडे :-**

कोणती कमी झाली आहे आणि कोणती वाढली आहे याची माहिती द्या आम्हाला.

**मा. सभापती :-**

रितसर माहिती पुढच्या सभेमध्ये द्या.

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

मी अगोदर सांगितले सर्व मौखिक विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देईल असे मी दावा करत नाहीए सर्व महानगरपालिकांचा दरांचा तुलनात्मक तक्तापण केलेला आहे. मिरा भाईदर सहीत वसई विरार नवी मुंबई ठाणे भिवंडी कल्याण डोंबिवली.

**रोहिदास पाटील :-**

मिटींग चालू व्हायच्या चार दिवस अगोदर माहिती द्या म्हणजे अभ्यास करुन येता येईल आम्हाला सभापती साहेब एक विषय असा आहे मगाच पासुन आपण त्याच्यावर जास्त वाढविला नाहीए विषय प्रशासनाकडुन याची मुदत संपली याला मुदत वाढवून द्या ठेक्याची मुदत संपलेली आहे याला मुदतवाढ द्या ही जी पॉलिसी आहे याच्याशी आम्ही सहमत नाही कर्तव्यातले कसून होते कर्तव्यात कसूर धरुन सगळ्यास वेठीस ठेवण्यापेक्षा आपल्या या महापालिकेत कोणकोणते ठेके कोणकोणत्या तारखेपर्यंत चालू आहेत आणि कोणत्या ठेक्याची मुदत संपलेली आहे यांची पुन्हा ठेकेदार नेमायचा आहे अशी एक लिस्ट आणा. मग तो मागतो वाहनाचा असेल व ट्रॅक्टरचा असेल जीसीपीचा असेल ज्याचे तुम्ही ठेके मांडता शिपाई असतील अमुक असतील शिक्षक असतील ठेकेदारीवर जी नेमणुक करायची असते ठेका द्यायचा असतो जसा बाजाराचा किती वेळेला आपण वाढविले त्यात उत्पन्न वाढले की कमी झाले? महापालिकेचे उत्पन्न वाढले की कमी झाले फायदा कुणाचा झाला? तोटा कुणाचा झाला? आता ही चर्चा करायची नाही पण ह्याच्यापुढे जे आहे ह्या ठेक्याच्या मुदत संपलेली आहे आणि इकडे गरजेचे आहे हा एक भाग या संपणार आहेत ठेका एक महिना आम्ही जर दिला तर त्याला अडचण नाहीए २५ फेब्रुवारीला ठेका संपणार आहे आणि एक फेब्रुवारीला आपण ठेकेदार दुसरा नेमला तरी अडचण काही होत नाही म्हणुन पूर्व तयारी करुन तसा प्रस्ताव आणा.

**मा. सभापती :-**

काकांनी ज्या पध्दतीने सांगितलेले आहे त्या पध्दतीने सगळ्या विभागाने त्याची माहिती पुढच्या मिटींगला घ्यावी.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब वन विभागामध्ये मजुर पुरवठा ठेका देतात त्याला वर्षवर्षभर काही होत नाही.

**रोहिदास पाटील :-**

आता आपण तेच आणले आहे. साधारण जेवढे चेहरे दिसतात आपण एका मतातले आहोत. ह्याच्यातले कुणी टेबलाखालचे नाही कुणी टेबलावरचे नाही आपण जितके पारदर्शक करता येईल तेवढा प्रयत्न करुया.

**मा. सभापती :-**

आपण आता दोन्ही विषय आणले मुदत वाढीचे त्याच्यासाठीच आणलेले आहेत आता बाकी जे आहेत ते सुध्दा येऊ द्या ना आपल्याला पहिल्यां माहिती मिळेल नंतर ते विषय घेऊ या ना.

**प्रभात पाटील :-**

आता साहेबांना एवढी माहिती दिली परवा आपण ह्याच मुद्याला धरुन महासभेत बोलले तेव्हा चक्क कानावर हात ठेवले गेलेले तुम्ही सगळे पण प्रेजेन्टी होतात असे कधी झाले नाही? बोललेत का नाही तुम्ही आणि आता हे सांगतात आम्ही प्रस्ताव दिला आम्ही मग त्यादिवशीचे काय होत महासभेमध्ये कोणी प्रश्न विचारतो त्याची दिशाभुल करणे हाच उद्देश होता ना.

**मा. उप-आयुक्त (मु.) :-**

नाही सभापती साहेब असा आरोप मला मान्य नाही. आपण प्रश्न उपस्थित केला होता ह्या दोन तीन दिवसामध्ये आपण एलबीटीचे दर वाढविले आहेत प्रश्न असा होता मी त्याचे उत्तर नाही म्हणुन दिले आहे.

**प्रभात पाटील :-**

त्याचे उत्तर असे नव्हते दोन तीन दिवसात वाढले नाहीत तुम्ही म्हणाले होते ना चार महिने अगोदर वाढलेत म्हणून दर वाढलेत की नाहीत हा माझा प्रश्न होता.

**मा. सभापती :-**

प्रभात ताई असु द्या आपण पुढच्या मिटींगमध्ये सगळी माहिती घेऊया.

**प्रभात पाटील :-**

यांना शब्दशः उत्तरे पाहिजे असेल तर आमचे पण शब्दशः प्रश्न .........

**मा. सभापती :-**

ढगे साहेब त्यावेळेला स्पष्ट बोलले गेले होतं की पेट्रोल डिझेलचे भाव वाढलेले ते एलबीटीचे वाढलेत का म्हणुन ठिक आहे पुढच्या मिटींगला आपण माहिती मागवू या.

**प्रभात पाटील :-**

त्या प्रश्नावर व त्या शब्दावर बोट ठेवून बोलता कामा नये अधिकाऱ्यांची उत्तरे अधिकाऱ्यांसारखी पाहिजेत.

**मा. सभापती :-**

ठीक आहे पुढच्या मिटींगला आम्हांला संपूर्ण माहिती द्या. सर्व सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे मानुन ही सभा संपली असे मी जाहिर करत आहे.

**(सभा संपल्याची वेळ दु. १२.३० वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मा. स्थायी समिती सभा

# दि. २०/१२/२०१३

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २०/१२/२०१३

मिरा भाईदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २०/१२/२०१३ रोजी सभा सुचना क्र. २१ दि. १६/१२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. शरद केशव पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | सभापती |
| २. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ४. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ५. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| ६. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| ७. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ८. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ९. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १०. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ११. | सौ. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १२. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| १३. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजु यशवंत भोईर | सदस्य |
| २. | श्रीम. शर्मिला बगाजी | सदस्या |
| ३. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |

**मा. सभापती :-**

सचिव साहेब सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी आज विषय एकच असल्यामुळे ..........

**अनिता पाटील :-**

हरकत नाही पण शिवाय काही तांत्रिक अडचणी आहेत की नाहीत त्यांना विषय लागेल ना?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मॅडम अधिकारी आहेत का नाहीत? कोरम हो गया सभा चालू कर सकते है।

**अनिता पाटील :-**

साहेब माझी अशी सुचना आहे अधिकारी येऊ द्या.

**मा. सभापती :-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे. आज एकच विषय असल्यामुळे ज्या विभागाचे अधिकारी आहेत इथे सचिवांनी सभा चालू करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २०/१२/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २१, दि. १६/१२/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १३८, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत संकल्पचित्र व संकल्पन तयार करुन मालमत्तेची मलनिःसारण जोडणी करणेकामी निविदा मंजूरीबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २९/१०/२०१३, ठराव क्र. १०३ फेरसादर)

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मिरा-भाईंदर शहराकरीता केंद्र शासनाच्या व जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नरूत्थान अभियाना अंतर्गत भुयारी गटार प्रकल्प मंजूर आहे. या भुयारी प्रकल्पा अंतर्गत मलवाहीनी टाकण्याचे काम व मलनिःसारण प्रकल्पाचे

कामं प्रगती पथावर आहे. सदरची कामे अंतिम करण्यापूर्वी शहारातील अपार्टमेंट व सोसायटीमधून येणारे Sewer ची जोडणी महापालिकेने केलेल्या मूळ मलवाहीनीस जोडणे आवश्यक आहे. मलवाहीनी जोडणी सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या एस.एम.सी. कमिटीने मजीप्राच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रूपये २२.६६ कोटीस मा. महासभेने या कामाच्या खर्चास मान्यता दिली होती. पाणीपुरवठा विभागाने या कामाच्या निविदा मागवून त्या उघडण्यांत आल्या व मा. स्थायी समितीपुढे मंजुरीकरीता दि. २९/१०/२०११ रोजीच्या सभेमध्ये सादर करून ठराव क्र. १०३ ने या कामास १४५% जास्त दराने कामास मंजुरी घेतलेली आहे.

| | | निविदेची किंमत रू. २२,२०,६६,८५५/- | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्राप्त दर | शेरा |
| १ | मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस् | १५३% | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. बुकऑन इंजिनियर्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १६५% | व्दितीय लघुत्तम |
| ३ | मे. श्रीकवीराज इन्फ्राटेक प्रा.लि. | ४५०% | तृतीय लघुत्तम |

वरीलप्रमाणे मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्स्ट्रॅक्टरस्, यांचा देकार लघुत्तम असून अंदाजपत्रकीय (रू.२२,२०,६६,८५५/-) किंमतीपेक्षा १५३.००% जादा आहे. त्यामुळे त्यांना वाटाघाटीने देकार कमी करणेकरीता कळविण्यात आले होते. त्यानुसार मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस्, यांनी त्यांच्या दि. १०/१०/२०१३ रोजीच्या पत्रानुसार दर कमी करून अंतिम देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४५% जास्तीचा आहे. सदर निविदेतील दर सन २००६-०७ दरसुचीवर असून चालू दरसुचीची सन २०१२-१३ नुसार सदर निविदा १४२.०८% जास्त दराची आहे. वाटाघाटीअंती आलेल्या दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | वाटाघाटीअंती प्राप्त दर | वाटाघाटीअंती निविदेची किमत |
|---|---|---|---|
| १ | मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस् | १४५% जास्तीचे | रू. ५४,४०,६३,७९५/- |

सदर निविदेतील दराची तुलना चालू दरसुचीशी केली असता १४२.०८% जादा दराने येत आहे. परंतु सदर निविदा चालू दरसुचीवरती २.९२% जास्तीची येत आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता निविदा १४५% जादा दराने (चालू दर सुचीवर २.९२% जादा दराने) ही सभा कलम ७३ (क) नुसार कामास मंजुरी देत आहे. असा ठराव बहुमताने मंजुर केलेला होता.

वरील निवीदेतील दरांचा तपशील पाहता मा. स्थायी समितीस १०% पर्यतच्या निवीदा मंजुर करण्याचा अधिकार आहे. कामाच्या निविदा १४५% जास्त दराच्या असल्याने अशा कामाच्या निविदा मंजुर करण्याचा अधिकार मा. स्थायी समितीस नाही. प्रशासनाने मंजुर निविदेतील २.९२% जास्तीचे दर हे मागील दराप्रमाणे सादर केलेले आहेत.

तसेच याकामी मे. ए.पी.आय.सिव्हील कॉन प्रा.लि हे ठेकेदार सदर काम रू. ४५ कोटी पर्यंत करण्याची तयारी दर्शविलेबाबतचे पत्र मा. स्थायी समिती सभा दि. २३/१२/२०१३ रोजी होण्यापूर्वी त्यांनी मा. आयुक्त सो., मा. महापौर, मा. सभापती यांना दिलेले होते.

दिलेल्या पत्राप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम २(२) प्रमाणे निविदा न मागवता देखील स्थायी समितीच्या कार्यवृत्तांत कारणे नमूद करून सदरचे काम फायदेशीर आहे असे असल्याने सदर कामाची निवीदा स्विकारणेकरीता प्राधिकृत करणेचा अधिकार मा. स्थायी समितीला असल्याने सदर काम हे मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर यांना न देता त्यांच्यापेक्षा कमी किंमतीने काम करणाऱ्या ठेकेदारास ठेका देणेबाबत मा. स्थायी समितीमध्ये विचारविनीमय होणे आवश्यक होते. व तसा अधिकार मा. आयुक्त सो., यांना देणे शक्य होते. तसे न केल्यामुळे मा. आयुक्त सो., यांना अधिनियमातील तरतुद ५(२)(२) चा अधिकाराचा वापर करून सदर काम देण्याचा निर्णय घेता आला असता. परंतु अशाप्रकारे कार्यवाही झालेली नाही. व मा. स्थायी समितीने हे काम मे. ए.पी.आय.सिव्हील कॉन प्रा.लि. सिव्हील इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांना न देता मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स या ठेकेदारास १४५% जास्त दराने काम देण्याचा निर्णय घेतला. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

करीता निवीदेप्रक्रियेमध्ये महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान व निविदेतील त्रुटी पाहता मा. सभापती, स्थायी समिती यांनी आवश्यक अधिक संख्या इतक्या सदस्यांच्या पाठींबा दिल्याचे पत्र देवून सदर विषयाच्या ठरावावर चर्चा/फेरबदल करणेकरीता मा. स्थायी समितीचे आयोजन पुढील नियमातील तरतुदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनिसूचित 'ड' प्रकरण २ (महानगरपालिका) कामकाज नियम १ (र) प्रमाणे मा. स्थायी समिती सभा दि. २०/१२/२०१३ बोलावलेली आहे.

सदर कामाबाबत शासनाकडे व लाचलुचपत खात्याकडे तक्रारी झालेल्या आहेत. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान व या निविदेतील त्रुटी पाहता दि. २९/१०/२०१३ च्या मा. स्थायी समितीमध्ये पारित झालेला ठराव क्र. १०३ रद्द करणे योग्य आहे. याकरीता या कामाच्या फेरनिविदा मागविण्यात याव्यात. सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पनामध्ये जास्तीची रक्कम ठेवण्यात यावी. या कामाच्या निविदा मागवताना स्पर्धा व पारदर्शकता व्हावी,

महानगरपालिकेचे आर्थिक हित पहावे, या करीता प्रशासनाने निविदेतील अटीशर्ती मध्ये शिथीलता आणावी, अनावश्यक बाबी वगळाव्यात, जास्तीत जास्त ठेकेदार या कामासाठी निवीदा भरतील हे पहावे व स्पर्धात्मक निविदा मागवाव्यात असे सूचित करण्यात येत आहे.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करता व महानगरपालिकेचा आर्थिक फायदा पाहता दि. २९/१०/२०१३ रोजी मा. स्थायी समितीमध्ये या कामाचा पारीत झालेला ठराव क्र. १०३ रद्द करण्यात यावे तसेच या कामाच्या फेरनिविदा मागविण्यात यावेत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**अश्विन कासोदरीया :-**

माझे अनुमोदन आहे.

**वंदना पाटील :-**

तुम्ही आता बोलले अधिकारी तो विषय नाही आहे. म्हणुन अधिकारी नाही आहे. मग आपण असे करायचं का? जेवढे विषय आहेत त्याच अधिकाऱ्यांना बोलवायचं त्याचा टाईमपास का वेस्ट करायचं मग ते सांगा मला?

**मा. सभापती :-**

आज एकच विषय आहे आणि त्या विषयाचे जे अधिकारी हजर आहेत आणि हा ठराव मांडलेला आहे आपल्याला ठराव मांडायचा असेल तर मांडा तर हा ठराव मी सर्वानुमते मंजुर करतो.

**अनिता पाटील :-**

मला वाकोडे साहेबांना विचारायचे आहे एकदा ठराव झाल्यानंतर तो विखंडीत केल्याशिवाय पुन्हा ठराव मांडता येतो का?

**हंसुकुमार पांडे :-**

वाकोडे साहेब उत्तर द्या.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सचिव महोदय वोटींग करावी.

**मा. सभापती :-**

सचिव महोदय हा ठराव मी सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

आज मुझे कहना है आज इतने घाई घाई मे ठराव इतना जल्दी मंजुर किये जा रहा है। इसके उपर कोई चर्चा नही डायरेक्ट मंजुरी दि जाती है।

**अनिता पाटील :-**

आणि आम्हाला ठराव मांडायचा आहे हे पण आम्ही सांगितले आहे त्याच्याआधी आम्हाला माहिती हवी तांत्रीक दृष्ट्या योग्य आहे का अयोग्य आहे.

**सुरेश वाकोडे :-**

सभापतींच्या परवानगीने बोलतो येथे प्रॉपर्टी कनेक्शन आहे जी आपली भुयारी गटारी योजना जी मान्यता आहे त्याचे काम आपले चालु आहे आतापर्यंत आपण ८७ टक्के काम झालेले आहे. ही आज कशी आहे ह्या दोन गोष्टी मला सांगु द्या आपण जे भुयारी गटार योजना मंजुर केलेली आहे नी ८७ टक्के काम चालले आहे काही ठिकाणी एसटीपी पूर्ण झालेली आहे ६ एसटीपी पूर्ण झालेला आहे आणि काही ठिकाणी २ एसटीपी चालू आहे अशा परिस्थीतीमध्ये जर आपली प्रॉपर्टी आहे ती ह्या चेबरला जोडली नाही तर सी वर येणार कसे सीवर नाही आले तर ही सिस्टीम पुढे चालू शकत नाही आहे. शासनाकडे आम्ही गेलो होतो शासनाला म्हटले की आम्ही सिवरेजचा पण डीपीआर केला आपण मान्यता दिली ह्यामध्ये सिवरेजचा कनेक्शन जो पार्ट आहे तो ह्याच्यामध्ये सिवरेजचा कनेक्शन जो पार्ट आहे तो ह्याच्यामध्ये आलेला नाही आहे. ह्या पार्टला मान्यता द्या त्यावेळी केंद्रशासनाने काय सांगितले ठिक त्यामध्ये तुम्हाला मान्यता ह्याच्यामध्ये देऊ पण तुम्हाला करंट येत नाही जुना तो तुमचा डीपीआर मंजुर झाला आहे तो सन २००५-०६ च्या नुसार मंजुर झालेला आहे म्हणुन तुम्ही जो डीपीआर बनवा २००५-०६ च्या रेटनुसार आताच्या आपण जेव्हा डीपीआर सादर केला रेट त्याचे २००५-०६ सालचे केले. २००५-०६ चे रेट आपण घेऊन डीपीआर केला आणि त्याला केंद्रशासनाने तेव्हा ३०/०१/२०१३ ला मंजुरी दिली ती जुन्या रेटने २२.६३.

**मा. सभापती :-**

वाकोडे साहेब बसा तुम्ही ही सर्व चर्चा अगोदर झालेली आहे तुम्ही ठराव मांडायचा असेल तर मांडून घ्या.

**अनिता पाटील :-**

सभापती साहेब तुमचा ठराव पास होणार आहे पण आम्हाला तर ऐकू द्या.

**हंसुकुमार पांडे :-**

अगोदर ठराव झालेला आहे तर तो परत कशाला आणायचा आहे त्याचे उत्तर द्या आम्हाला?

**मा. सभापती :-**

ठराव ह्याच्यासाठी आणलेला की जी रक्कम जास्त होत होती त्यामुळे ठराव आम्ही परत आणला आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

त्यावेळी त्या कॉन्ट्रॅक्टरने आजपासून घेतला का नाही त्यावेळी टेंडर का भरले नाही? कॉन्ट्रॅक्टर आता आम्हाला बोलतो मी सभापती साहेबांना विचारतो.

**मा. सभापती :-**

मी काय सांगतो जी काही माहिती द्यायची होती ती आम्ही दिलेली आहे ठराव मांडलेला आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही ठराव मांडला पण पहिला का त्याने टेंडर नाही भरले?

**मा. सभापती :-**

तुम्हाला ठराव मांडायचा असेल तर मांडा ना.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मालमत्तेची जोडणी भुयारी गटार योजनेच्या Sewer line ला जोडणेकामी मागविण्यात आलेल्या निविदा तांत्रिक दृष्टया व शासनाच्या प्रचलित पध्दतीनुसार पारदर्शक होण्याकरिता आवश्यकत्या सर्व पातळीवर तपासणी करुन निविदा मागविण्यात आलेली आहे. तसेच सदर कामाचा गोषवारा मा. आयुक्त यांच्या मान्यतेने मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला होता. निविदाकाराने भरलेला दर १५३% जास्तीचा आहे. ठेकेदाराने दि.१०/१०/२०१३ रोजीच्या पत्रानुसार वाटाघाटी अंती सदरचा दर १४५% जास्तीचा दिलेला आहे. तसेच सदरचा दर जास्तीचा असल्याबाबत निविदाकाराने योग्य स्पष्टीकरण दिलेले आहे. तसेच सदर निविदा सन २००६-०७ च्या दरसुचीवर आधारित असून चालू दरसुचीवरती २.९२ % जास्तीची आहे. त्यामुळे सदरची निविदा १४५% जास्त दराने (चालू दरसुचीवरती २.९२% इतकी वाढीव आहे.) मंजुरीकरिता मा. स्थायी समितीपुढे मंजुरीकरिता ठेवण्यात आलेली होती. निविदे अंतर्गत प्राप्त झालेले दर हे तांत्रिक दृष्टया योग्य असल्याने दि. १७/१०/२०१३ रोजीच्या मा. आयुक्त सो। यांच्या मान्यतेने सादर केलेल्या गोषवारा प्रमाणे सदरची निविदा प्रशासनाने मंजुरीकरिता मा. स्थायी समिती पुढे ठेवलेली होती व सदर निविदा प्रक्रिया पारदर्शक असल्याने मा. स्थायी समितीने ठराव क्र. १०३ दिनांक २९/१०/२०१३ अन्वये निविदा बहुमताने मंजूर केलेली आहे.

जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत भुयारी गटार योजनेचा प्रकल्प मालमत्तेची मलनिःसारण जोडणी करुन मार्च २०१४ पर्यन्त सुरु करावयाचा आहे. तसेच सदर प्रकल्प अहवालास केंद्र शासनाने सुध्दा मंजुरी दिलेली आहे. जेएनएनयुआरएम मिशनचा कालावधी मार्च २०१४ पर्यन्तच आहे त्यामुळे तद्नंतर निधी प्राप्त होणार नाही. या मालमत्तेची जोडणी भुयारी गटार योजनेस केल्याशिवाय प्रकल्प सुरु करता येणार नाही. काही मलनिःसारण केंद्रांची कामे पूर्ण होत आलेली असून मालमत्ता जोडणी नसल्यामुळे मलनिःसारण केंद्रे सुरु करता येत नाहीत. त्यामुळे सदरची कामे लवकरात लवकर होण्याकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३ दि.२९/१०/२०१३ अन्वये प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली असून सदर मंजुरीत कोणताही फेरबदल न करता प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याच्या आधीन राहून ठराव कायम ठेवण्यात यावा. तसेच दि.२०/१२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती पुढे फेरबदलाकरिता ठेवण्यात आलेला विषय प्रशासनामार्फत ठेवण्यात आलेला नसल्याने मुळ ठरावात कोणताच फेरबदल करण्यात येऊ नये. असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

१३८ करीता दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव सुचक डॉ. राजेंद्र जैन अनुमोदन अश्विन कासोदरीया, दुसरा ठराव सुचक प्रभात पाटील अनुमोदन वंदना पाटील. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मालमत्तेची जोडणी भुयारी गटार योजनेच्या Sewer line ला जोडणेकामी मागविण्यात आलेल्या निविदा तांत्रिक दृष्टया व शासनाच्या प्रचलित पध्दतीनुसार पारदर्शक होण्याकरिता आवश्यकत्या सर्व पातळीवर तपासणी करुन निविदा मागविण्यात आलेली आहे. तसेच सदर कामाचा गोषवारा मा. आयुक्त यांच्या मान्यतेने मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला होता. निविदाकाराने भरलेला दर १५३% जास्तीचा आहे. ठेकेदाराने दि.१०/१०/२०१३ रोजीच्या पत्रानुसार वाटाघाटी अंती सदरचा दर १४५% जास्तीचा दिलेला आहे. तसेच सदरचा दर जास्तीचा असल्याबाबत निविदाकाराने योग्य स्पष्टीकरण दिलेले आहे. तसेच सदर निविदा सन २००६-०७ च्या दरसुचीवर आधारित असून चालू दरसुचीवरती २.९२ % जास्तीची आहे. त्यामुळे सदरची निविदा १४५% जास्त दराने (चालू दरसुचीवरती २.९२% इतकी वाढीव आहे.) मंजुरीकरिता मा. स्थायी समितीपुढे मंजुरीकरिता ठेवण्यात आलेली होती. निविदे अंतर्गत प्राप्त झालेले दर हे तांत्रिक दृष्टया योग्य असल्याने दि. १७/१०/२०१३ रोजीच्या मा. आयुक्त सो। यांच्या मान्यतेने सादर केलेल्या गोषवारा प्रमाणे सदरची निविदा प्रशासनाने मंजुरीकरिता मा. स्थायी समिती पुढे ठेवलेली होती व सदर निविदा प्रक्रिया पारदर्शक असल्याने मा. स्थायी समितीने ठराव क्र. १०३ दिनांक २९/१०/२०१३ अन्वये निविदा बहुमताने मंजूर केलेली आहे.

जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत भुयारी गटार योजनेचा प्रकल्प मालमत्तेची मलनिःसारण जोडणी करुन मार्च २०१४ पर्यन्त सुरु करावयाचा आहे. तसेच सदर प्रकल्प अहवालास केंद्र शासनाने सुध्दा मंजुरी दिलेली आहे. जेएनएनयुआरएम मिशनचा कालावधी मार्च २०१४ पर्यन्तच आहे त्यामुळे तद्नंतर निधी प्राप्त होणार नाही. या मालमत्तेची जोडणी भुयारी गटार योजनेस केल्याशिवाय प्रकल्प सुरु करता येणार नाही. काही मलनिःसारण केंद्रांची कामे पूर्ण होत आलेली असून मालमत्ता जोडणी नसल्यामुळे मलनिःसारण केंद्रे सुरु करता येत नाहीत. त्यामुळे सदरची कामे लवकरात लवकर होण्याकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३ दि.२९/१०/२०१३ अन्वये प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली असून सदर मंजुरीत कोणताही फेरबदल न करता प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याच्या आधीन राहून ठराव कायम ठेवण्यात यावा. तसेच दि.२०/१२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती पुढे फेरबदलाकरिता ठेवण्यात आलेला विषय प्रशासनामार्फत ठेवण्यात आलेला नसल्याने मुळ ठरावात कोणताच फेरबदल करण्यात येऊ नये. असा मी ठराव मांडत आहे. या ठरावाच्या बाजुने कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत का?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सचिव साहेब अभी जो माहिती मांगी है उसका जवाब दो ना उनको माहिती चाहीए थी ना उनको।

**प्रशांत दळवी :-**

सचिव साहेब सभापती महोदय आम्ही विरोध का केला आहे? आम्हाला या संदर्भातली माहिती नाही आमच्याकडे संपूर्ण माहिती नाही त्यामुळे आम्हाला प्रशासनाने संपूर्ण माहिती द्यावी.

**मा. सभापती :-**

दोन्ही ठराव वाचून घ्या.

**नगरसचिव :-**

मिरा-भाईंदर शहराकरीता केंद्र शासनाच्या व जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्नरूत्थान अभियाना अंतर्गत भुयारी गटार प्रकल्प मंजूर आहे. या भुयारी प्रकल्पा अंतर्गत मलवाहीनी टाकण्याचे काम व मलनिःसारण प्रकल्पाचे काम प्रगती पथावर आहे. सदरची कामे अंतिम करण्यापूर्वी शहारातील अपार्टमेंट व सोसायटीमधून येणारे Sewer ची जोडणी महापालिकेने केलेल्या मूळ मलवाहीनीस जोडणे आवश्यक आहे. मलवाहीनी जोडणी सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या एस.एम.सी. कमिटीने मजीप्राच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रूपये २२.६६ कोटीस मा. महासभेने या कामाच्या खर्चास मान्यता दिली होती. पाणीपुरवठा विभागाने या कामाच्या निविदा मागवून त्या उघडण्यांत आल्या व मा. स्थायी समितीपुढे मंजुरीकरीता दि. २९/१०/२०११ रोजीच्या सभेमध्ये सादर करून ठराव क्र. १०३ ने या कामास १४५% जास्त दराने कामास मंजुरी घेतलेली आहे.

| | | **निविदेची किंमत रू. २२,२०,६६,८५५/-** | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव** | **प्राप्त दर** | **शेरा** |
| १ | मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस् | १५३% | प्रथम लघुत्तम |
| २ | मे. बुकऑन इंजिनियर्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १६५% | व्दितीय लघुत्तम |
| ३ | मे. श्रीकवीराज इन्फ्राटेक प्रा.लि. | ४५०% | तृतीय लघुत्तम |

वरीलप्रमाणे मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्स्ट्रॅक्टरस्, यांचा देकार लघुत्तम असून अंदाजपत्रकीय (रू.२२,२०,६६,८५५/-) किंमतीपेक्षा १५३.००% जादा आहे. त्यामुळे त्यांना वाटाघाटीने देकार कमी करणेकरीता कळविण्यात आले होते. त्यानुसार मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस्, यांनी त्यांच्या दि. १०/१०/२०१३ रोजीच्या पत्रानुसार दर कमी करून अंतिम देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४५% जास्तीचा आहे. सदर निविदेतील दर सन २००६-०७ दरसुचीवर असून चालू दरसुचीची सन २०१२-१३ नुसार सदर निविदा १४२.०८% जास्त दराची आहे. वाटाघाटीअंती आलेल्या दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | वाटाघाटीअंती प्राप्त दर | वाटाघाटीअंती निविदेची किंमत |
|---|---|---|---|
| १ | मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरस् | १४५% जास्तीचे | रू. ५४,४०,६३,७९५/- |

सदर निविदेतील दराची तुलना चालू दरसुचीशी केली असता १४२.०८% जादा दराने येत आहे. परंतु सदर निविदा चालू दरसुचीवरती २.९२% जास्तीची येत आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता निविदा १४५% जादा दराने (चालू दर सुचीवर २.९२% जादा दराने) ही सभा कलम ७३ (क) नुसार कामास मंजुरी देत आहे. असा ठराव बहुमताने मंजुर केलेला होता.

वरील निवीदेतील दरांचा तपशील पाहता मा. स्थायी समितीस १०% पर्यंतच्या निवीदा मंजुर करण्याचा अधिकार आहे. कामाच्या निविदा १४५% जास्त दराच्या असल्याने अशा कामाच्या निविदा मंजुर करण्याचा अधिकार मा. स्थायी समितीस नाही. प्रशासनाने मंजुर निविदेतील २.९२% जास्तीचे दर हे मागील दराप्रमाणे सादर केलेले आहेत.

तसेच याकामी मे. ए.पी.आय.सिव्हील कॉन प्रा.लि हे ठेकेदार सदर काम रू. ४५ कोटी पर्यंत करण्याची तयारी दर्शविलेबाबतचे पत्र मा. स्थायी समिती सभा दि. २३/१२/२०१३ रोजी होण्यापूर्वी त्यांनी मा. आयुक्त सो., मा. महापौर, मा. सभापती यांना दिलेले होते.

दिलेल्या पत्राप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ मधील नियम २(२) प्रमाणे निविदा न मागवता देखील स्थायी समितीच्या कार्यवृत्तांत कारणे नमूद करून सदरचे काम फायदेशीर आहे असे असल्याने सदर कामाची निवीदा स्विकारणेकरीता प्राधिकृत करणेचा अधिकार मा. स्थायी समितीला असल्याने सदर काम हे मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर यांना न देता त्यांच्यापेक्षा कमी किंमतीने काम करणाऱ्या ठेकेदारास ठेका देणेबाबत मा. स्थायी समितीमध्ये विचारविनीमय होणे आवश्यक होते. व तसा अधिकार मा. आयुक्त सो., यांना देणे शक्य होते. तसे न केल्यामुळे मा. आयुक्त सो., यांना अधिनियमातील तरतुद ५(२)(२) चा अधिकाराचा वापर करून सदर काम देण्याचा निर्णय घेता आला असता. परंतु अशाप्रकारे कार्यवाही झालेली नाही. व मा. स्थायी समितीने हे काम मे. ए.पी.आय.सिव्हील कॉन प्रा.लि. सिव्हील इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांना न देता मे. ओंकार इंजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स या ठेकेदारास १४५% जास्त दराने काम देण्याचा निर्णय घेतला. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

करीता निवीदेप्रक्रियेमध्ये महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान व निविदेतील त्रुटी पाहता मा. सभापती, स्थायी समिती यांनी आवश्यक अधिक संख्या इतक्या सदस्यांच्या पाठींबा दिल्याचे पत्र देवून सदर विषयाच्या ठरावावर चर्चा/फेरबदल करणेकरीता मा. स्थायी समितीचे आयोजन पुढील नियमातील तरतुदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनिसूचित 'ड' प्रकरण २ (महानगरपालिका) कामकाज नियम १ (र) प्रमाणे मा. स्थायी समिती सभा दि. २०/१२/२०१३ बोलावलेली आहे.

सदर कामाबाबत शासनाकडे व लाचलुचपत खात्याकडे तक्रारी झालेल्या आहेत. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान व या निविदेतील त्रुटी पाहता दि. २९/१०/२०१३ च्या मा. स्थायी समितीमध्ये पारित झालेला ठराव क्र. १०३ रद्द करणे योग्य आहे. याकरीता या कामाच्या फेरनिविदा मागविण्यात याव्यात. सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पनामध्ये जास्तीची रक्कम ठेवण्यात यावी. या कामाच्या निविदा मागवताना स्पर्धा व पारदर्शकता व्हावी. महानगरपालिकेचे आर्थिक हित पहावे, या करीता प्रशासनाने निविदेतील अटीशर्ती मध्ये शिथीलता आणावी. अनावश्यक बाबी वगळाव्यात, जास्तीत जास्त ठेकेदार या कामासाठी निवीदा भरतील हे पहावे व स्पर्धात्मक निविदा मागवाव्यात असे सूचित करण्यात येत आहे.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करता व महानगरपालिकेचा आर्थिक फायदा पाहता दि. २९/१०/२०१३ रोजी मा. स्थायी समितीमध्ये या कामाचा पारीत झालेला ठराव क्र. १०३ रद्द करण्यात यावे तसेच या कामाच्या फेरनिविदा मागविण्यात यावेत असा ठराव मांडण्यात येत आहे. या ठरावाच्या बाजुने कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत का?

**मा. सभापती :-**

सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ६ विरोधात ५, तटस्थ २ प्रभात पाटील यांनी मांडलेला ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत संकल्पचित्र व संकल्पन तयार करुन मालमत्तेची मलनिःसारण जोडणी करणेकामी निविदा मंजूरीबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २९/१०/२०१३, ठराव क्र. १०३ फेरसादर)

**ठराव क्र. १२७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत मालमत्तेची जोडणी भुयारी गटार योजनेच्या Sewer line ला जोडणेकामी मागविण्यात आलेल्या निविदा तांत्रिक दृष्टया व शासनाच्या प्रचलित पध्दतीनुसार पारदर्शक होण्याकरिता आवश्यकत्या सर्व पातळीवर तपासणी करुन निविदा मागविण्यात आलेली आहे. तसेच सदर कामाचा गोषवारा मा. आयुक्त यांच्या मान्यतेने मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला होता. निविदाकाराने भरलेला दर १५३% जास्तीचा आहे. ठेकेदाराने दि.१०/१०/२०१३ रोजीच्या पत्रानुसार वाटाघाटी अंती सदरचा दर १४५% जास्तीचा दिलेला आहे. तसेच सदरचा दर जास्तीचा असल्याबाबत निविदाकाराने योग्य स्पष्टीकरण दिलेले आहे. तसेच सदर निविदा सन २००६-०७ च्या दरसुचीवर आधारित असून चालू दरसुचीवरती २.९२ % जास्तीची आहे. त्यामुळे सदरची निविदा १४५% जास्त दराने (चालू दरसुचीवरती २.९२% इतकी वाढीव आहे.) मंजुरीकरिता मा. स्थायी समितीपुढे मंजुरीकरिता ठेवण्यात आलेली होती. निविदे अंतर्गत प्राप्त झालेले दर हे तांत्रिक दृष्टया योग्य असल्याने दि. १७/१०/२०१३ रोजीच्या मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने सादर केलेल्या गोषवारा प्रमाणे सदरची निविदा प्रशासनाने मंजुरीकरिता मा. स्थायी समिती पुढे ठेवलेली होती व सदर निविदा प्रक्रिया पारदर्शक असल्याने मा. स्थायी समितीने ठराव क्र. १०३ दिनांक २९/१०/२०१३ अन्वये निविदा बहुमताने मंजूर केलेली आहे.

जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत भुयारी गटार योजनेचा प्रकल्प मालमत्तेची मलनिःसारण जोडणी करुन मार्च २०१४ पर्यन्त सुरु करावयाचा आहे. तसेच सदर प्रकल्प अहवालास केंद्र शासनाने सुध्दा मंजुरी दिलेली आहे.

जेएनएनयुआरएम मिशनचा कालावधी मार्च २०१४ पर्यन्तच आहे त्यामुळे तद्नंतर निधी प्राप्त होणार नाही. या मालमत्तेची जोडणी भुयारी गटार योजनेस केल्याशिवाय प्रकल्प सुरु करता येणार नाही. काही मलनिःसारण केंद्रांची कामे पूर्ण होत आलेली असून मालमत्ता जोडणी नसल्यामुळे मलनिःसारण केंद्रे सुरु करता येत नाहीत. त्यामुळे सदरची कामे लवकरात लवकर होण्याकरिता मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३ दि.२९/१०/२०१३ अन्वये प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली असून सदर मंजुरीत कोणताही फेरबदल न करता प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याच्या आधीन राहून ठराव कायम ठेवण्यात यावा. तसेच दि.२०/१२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती पुढे फेरबदलाकरिता ठेवण्यात आलेला विषय प्रशासनामार्फत ठेवण्यात आलेला नसल्याने मुळ ठरावात कोणताच फेरबदल करण्यात येऊ नये. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात प्रकाश पाटील**　　　　**अनुमोदक :- श्रीम. वंदना मंगेश पाटील**

| ठरावाच्या बाजूने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) सौ. प्रभात प्रकाश पाटील | १) श्री. शरद केशव पाटील | १) श्री. प्रशांत दळवी |
| २) श्रीम. अनिता जयवंत पाटील | २) श्री. रोहिदास पाटील | २) श्री. हरिश्चंद्र आंमगावकर |
| ३) श्री. मुन्ना सिंह | ३) श्रीम. मिरादेवी यादव | |
| ४) श्रीम. वंदना मंगेश पाटील | ४) डॉ. राजेंद्र जैन | |
| ५) श्री. परशुराम म्हात्रे | ५) श्री. अश्विन कासोदरीया | |
| ६) श्री. हंसुकुमार पांडे | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सभापती महोदय हंसुकुमार पांडे सदस्यांनी बोला की, टेंडर क्यो नही भरा ४० ते ४५ करोड का बोला वाकोडे साहब से आदर करुंगा वाकोडे साहेब मुझे ये बताये जिस कॉन्ट्रॅक्टर को टेंडर मिला है उसके लिए आपने अटी शर्ती को डिल किया है क्या?

**सुरेश वाकोडे :-**

सभापतींच्या परवानगीने बोलतो अटी शर्ती आपण शिथील केलेल्या नाहीत आपण जेव्हा यांची निविदा.....

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जो कॉन्ट्रॅक्टर जिसको मिला है उसके लिए अपने कोर्ट अटीशर्ती डिल नही की है।

**सुरेश वाकोडे :-**

अटीशर्ती ह्याच्यामध्ये आपण काय केले साहेब? ............

**डॉ. राजेंद्र जैन :-**

कोईभी अटीशर्ती डिल किया है की नही उसके लिए कनेक्शन की व टर्नवर्किंग

**सुरेश वाकोडे :-**

आपण टेंडर नोटीस दिली टेंडर काढले टेंडर काढल्यानंतर एक्स्टेन्शन दिले.

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ सकाळी ११.३० वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.३०/०५/२०१४.

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( 03 ) :- मा. स्थायी समिती सभा दि. १७/०२/२०१४ ठराव क्र. १४६ व दि.२६/०२/२०१४ ठराव क्र. १५६ मध्ये मूळ गोषवाऱ्या व्यतिरीक्त बाबीबाबत झालेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत चा अहवाल.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात करावयाच्या विविध विकास कामांच्या नऊ निविदा मान्यतेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समिती सभा दि. १७/०२/२०१४ प्रकरण क्रमांक १५५ अन्वये सादर करण्यात आल्या होत्या. मा. स्थायी समिती सभा दि. १७/०२/२०१४ ठराव क्र. १४६ व मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १५६ दि २६/०२/२०१४ ठराव क्र. १५६ अन्वये सदर निविदांना मान्यता दिली. तथापी सदर मान्यतेसोबत प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यात नमूद नसलेल्या बाबीबाबत निर्णय घेतलेले आहेत. मा. स्थायी समिती सभेने गोषवाऱ्यानूसार ठराव करणे अपेक्षित आहे. सदर गोषवाऱ्या व्यतिरीक्त घेतलेल्या निर्णयाबाबत सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ. क्र | मा. स्थायी समितीचे निर्णय | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | रस्त्याच्या कामास सुरुवात करण्या अगोदर सदर रस्ता व गटाराचे काम सुरु करण्या अगोदर त्याखाली येणाऱ्या मनपाची मालमत्ता जोडणी तसेच रिलायन्स ची केबल, एम.टी.एन.एल ची केबल, गॅस लाईन व इतर काही जमिनीच्या खालुन जाणारे असेल ते स्थलांतरीत करुन घ्यावे. जर तसे न करता काम सुरु केल्यास व केलेल्या रस्त्याची, गटाराची तोडफोड झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात डांबराचे रस्ते असुन अंतर्गत पायवाटा ह्या सिमेंट क्रॉकिटच्या तयार करण्यात आलेल्या आहेत. सदर रस्त्यावरुन विविध यंत्रणाच्या सार्वजनिक प्रयोजनाकरीता केबल्स, गॅस वाहिनी, दुरध्वनी केबल्स, फायबर केबल्स यांचे जाळे पसरलेले असुन महानगरपालिकेच्या जलवाहीन्या व मलवाहिन्या यांचे जाळे देखील पसरलेले आहे. मा. स्थायी समिती सभेच्या निर्णयानुसार नविन रस्त्याचे काम करताना अशा केबल्स व वाहिन्या स्थलांतरीत करुन एका बाजुस घेणे शक्य आहे. संबंधित कंत्राटदाराचा कामाचा कालावधी हा सदर युटीलिटी स्थलांतरीत झाल्यानंतरचा धरावा लागणार आहे. त्यानूसार कार्यादेशात अट नमूद करण्यास मान्यता असावी.<br>तथापी ज्या रस्त्याचे मजबुतीकरण करावयाचे असेल त्या ठिकाणी संपूर्ण रस्ता खोदता येत नसल्याने अशा ठिकाणी |

| | | |
|---|---|---|
| | | स्थलांतरणाची कामे करणे शक्य होणार नाहीत. मा. स्थायी समितीच्या निर्णयाची नविन रस्त्यासाठी अंमलबजावणी करता येईल. परंतु पुर्नपृष्ठीकरण व मजबुतीकरणाच्या ठिकाणी स्थलांतरण करावयाचे असल्यास संपूर्ण रस्ता खोदुन काढुन टाकावा लागेल व मोठा खर्च येईल. त्यामुळे पुर्नपृष्ठीकरण व मजबुतीकरण कामाच्या ठिकाणी युटीलिटी स्थलांतरीत करता येणार नाही. |
| २ | सदरचे काम दिलेल्या डी.एस.आर प्रमाणे व कार्यादेशात नमुद केलेल्या लांबी रुंदी प्रमाणे व दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्याच्या हमीवर ठेकेदाराला कार्यादेश देण्यात यावा. | निविदातील दर हे जिल्हादरसुचीतील दरानुसार असुन मोजमापानुसारच अंदाजपत्रके तयार केलेली असतात व कंत्राटदाराना काम पूर्ण करण्याचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम कार्यादेशात नमुद करुन देण्यात येत असतो. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. |
| ३ | या पुढे काम सुरु करण्यापूर्वी किंवा कामाची निविदा काढण्यापूर्वी सदरचे काम ज्या ठिकाणी करावयाचे आहे. त्या ठिकाणी कोणतीही अडचण / अडकाठी असणार नाही याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी. | या पुढे कोणतेही नविन काम सुरु करण्यापूर्वी किंवा कामाची निविदा काढण्यापूर्वी कामाच्या ठिकाणी जागेचे वाद, युटीलिटी सर्व्हीसेस, अतिक्रमण नाही व इतर कोणती अडचण नाही याची खात्री करुन काम करावयाचे झाल्यास सर्वप्रथम जागेवरील अतिक्रमण काढणे, जागा महापालिकेच्या नावावर करणे, सर्व युटीलिटी रस्त्याकडेला स्थलांतरीत कामे न्यायालयातील निर्णय करून घेणे. ही कामे प्रथम करावी लागतील व एकही काम मंजूर होऊ शकणार नाही. प्रशासनामार्फत नागरीकांच्या सोयी साठी सार्वजनिक ठिकाणी करावयाच्या कामांच्या आवश्यक मान्यता घेऊन कंत्राटदारास कार्यादेश देण्यात येतात व प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणी दूर करुन कामे करण्यात येतात. अशीच पध्दत सर्व महापालिका, एम.एम.आर.डी.ए. व इतर स्थानिक, राज्य संस्थामध्ये अवलंबिण्यात येते. त्यामुळे सदर निर्णयाची अंमलबजावणी करणे संयुक्तिक नाही. |
| ४ | एखादे काम कार्यादेश दिल्यानंतर कामात दिरंगाई / उशीर झाल्यामुळे डीएसआरचे दर वाढल्यामुळे काम पूर्ण न होता अर्धवट अवस्थेत काम राहू शकते व उर्वरीत कामासाठी ठेकेदार | प्रत्यक्षात कामाचे कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष जागेवरील अडचणीमुळे कामास विलंब होतो. सदर बाबी मा. आयुक्त यांच्या वेळोवेळी निदर्शनास आणून देऊन मुदतवाढ घेण्यात येतात. |

| | | |
|---|---|---|
| | वाढीव रकमेची मागणी करतात, त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होतो. त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही. | निविदातील अटीशर्ती व शासन सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका व शासन निर्णयानूसार विलंब झाल्यास तसेच कामात शासन बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक. बिएटी ०६/०४/१४८/इमारती २ दि.१६ मे २००५ नूसार दरवाढ देणे बंधनकारक आहे. तथापी महानगरपालिकेचे कामास विलंब झाल्यास दरवाढ दयावी लागणार असल्याने नुकसान होऊ नये यासाठी ज्या कामांची मुदत १ वर्ष आहे अशा कामांना दरवाढ देता येणार नाही ही अट निविदा फॉर्म मध्ये टाकण्यात येईल. |
| ५ | या पुढे निविदा मागविताना डांबरीकरणासाठी प्लांटची अट व अमूक किलोमिटर व प्लांट असावे ही अट कमी करण्यात येत आहे. त्यामुळे कामात पारदर्शकता होईल. मोठया प्रमाणात स्पर्धा होऊन त्यामध्ये नेहमीच्या ठेकेदारांची मक्तेदारी मोडून नविन ठेकेदार आल्यामुळे कमी दराच्या निविदा प्राप्त होतील. अशा अटीशर्ती ज्या ठेकेदाराना मान्य असतील त्या ठेकेदाराना काम देण्यात यावे, त्यामुळे मनपाच्या मोठया प्रमाणावर आर्थिक फायदा होईल. या बाबीचा विचार करुन सदरची सूचना यानंतर येणाऱ्या प्रत्येक विभागाच्या कामाला लागू राहील. | डांबरीकरणाच्या कामात प्रत्यक्षात रस्त्यावर डांबर करतेवेळी डांबर प्लाट ते प्रत्यक्ष कामाचे ठिकाण यामधील वेळ व अंतर ठराविक असल्यास प्रत्यक्ष डांबराचे विहीत तापमान राखणे शक्य होते. त्यामुळे डांबरीकरणाच्या कामासाठी डांबर प्लांट ३० किमीटर अंतरावर असणे बंधनकारक आहे. तथापी डांबर प्लाट नसणाऱ्या कंत्राटदारावर देखिल डांबरीकरणाच्या कामामध्ये सहभगी होण्यासाठी डांबराचे प्लांट असणाऱ्या कंत्राटदारासोबत इतर कंत्राटदाराना Joint Venture करता येऊ शकेल. Joint Venture बाबत कायदेशिर करारनामा व भागीदारीचा तपशिले असणे आवश्यक आहे. सदर अट डांबरीकरणाच्या निविदामध्ये टाकण्यात येईल. |
| ६ | नगरोत्थान व इतर नाले, गटारे, कॉक्रीटीकरण कामासाठी आर.सी.सी. गटारासाठी आर.एम.सी. प्लांट हे अमूक अमूक किलो मिटरवर असावे अशी अट कमी करण्यात येत आहे. | नगरोत्थान व इतर नाले, गटारे, कॉक्रीटीकरण कामासाठी आर.सी.सी. गटारासाठी आर.एम.सी. प्लांट ची अट व सदर प्लांट विहीत अंतरावर असावे अशी अट नाही. तथापी महानगरपालिका क्षेत्रातील कामाची स्थळे, बांधकाम साहीत्य टाकण्यासाठी जागेची अडचण, बांधकाम साहीत्यामुळे रस्त्यावर होणारी वाहतूकीची कोंडी व नगरोत्थान योजनेच्या कामात प्रचंड स्वरुपात लागणाऱ्या कॉक्रीट चे परिणाम लक्षात घेता मा. स्थायी समिती सभा दि.०४/०५/२०११ ठराव क्र. १२ अन्वये घेतलेल्या निर्णयानूसार सर्व |

| | | |
|---|---|---|
| | | कामांच्या अंदाजपत्रकात जिल्हा दरसूचीतील दरानूसार उपलब्ध असलेले आर.एम.सी. कॉक्रीटचे दर घेण्यात येतात. संबधित कंत्राटदार सदर आर.एम.सी. कॉक्रीट कोणत्याही आर.एम.सी. प्लांट मालकाकडून विकत घेऊ शकतात. याबाबत कंत्राटदाराची आजपर्यत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. आर.एम.सी. कॉक्रीट अंदाजपत्रकात घेणे आवश्यक आहे. |
| ७ | बिड कपॅसिटीची अट कमी करणे. | सदर बिड कपॅसिटीची अट शासन परिपत्रक क्रमांक निविदा १०/२०००/प्र.क्र.५०२/इमारती २ दि.२५ ऑक्टोंबर २००० अन्वये ठेवण्यात आलेली आहे. कंत्राटदार हे त्यांची आर्थिक कुवत नसताना मोठया रकमेची कामे घेतात व प्रत्यक्षात सदर कामे त्यांना करता येत नसल्याने शासनाने सदर अट टाकलेली आहे. शासन परिपत्रकानूसार सदर अट ठेवण्यात येत आहे. |

वरीलप्रमाणे मा. स्थायी समिती सभेने गोषवाऱ्या व्यतिरीक्त घेतलेल्या निर्णयाबाबतचा अहवाल माहीतीसाठी सादर करण्यात येत आहे.

**कार्यकारी अभियंता (सा.बां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

***मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.***

20

समिती

सचिव विभाग.

# मा. स्थायी समिती सभा दि.३०/०५/२०१४.
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (०४) :-** भाईंदर (पूर्व) नवघर शाळा इमारतीच्या तळमजल्यावरील वर्ग मतीमंद मुलांना प्रशिक्षण देणाऱ्या "प्रशिक" या संस्थेस भाड्याने उपलब्ध करून देणे बाबत निर्णय घेणे

भाईंदर (पूर्व) नवघर शाळा क्र. १३ च्या तळमजल्यावरील जागा मतिमंद मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी "प्रशिक" या संस्थेने उपलब्ध करून देण्यास विनंती केलेली आहे. मा. प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ यांनी नवघर शाळेच्या तळमजल्यावरील जागा उपलब्ध करून देण्यास हरकत नाही असे कळविलेले आहे. सदर जागेचे क्षेत्र १३८.३२ चौ.मीटर असून सदर जागेचे चालू बाजार भावानूसार (रेडी रेकनर) रु. ६,७६८/- प्रति महीना होत आहे. मा. महासभा दि.१५/०१/२०१३ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेत प्रदान करण्यात आलेले आहे. तरी सदर जागा भाड्याने उपलब्ध करून देण्यासाठी विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता (सावां)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

PC 2-DK 2013-15'SG.

[illegible] वेळ [illegible]
गोषवारा
[illegible]
नगरसचिव विभाग

# मा. स्थायी समिती सभा दि. ३०।०५।२०१४.
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (०५) :-** विविध विकास कामांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ३१ मधील दिपक हॉस्पीटल रस्ता, हर्ष प्लाझा ते ऑरेंज हॉस्पीट, आरक्षण क्र. २२१ पर्यत रस्ता तयार करणे कामांस मान्यता येऊन कार्यादेश आलेले आहेत. परंतु सदर रस्त्यावर यापुर्वी भुयारी गटार योजना व तदनंतर एका बाजुस नाला बांधणेचे काम सुरु आहे. नाला बांधण्याचे काम अपुर्ण अवस्थेत असून सदरचा विकास योजना रस्ता तयार करणे करीता एका बाजुस गटार बांधणे आवश्यक आहे. सदर रस्त्यावर हर्ष प्लाझा पासुन गटार बांधणे बाकी असून काम मंजुर नाही. गटाराचे काम केल्याशिवाय रस्ता तयार करणे उचित होणार नाही. रस्त्याच्या उतार गटाराकडे देऊन रस्ता तयार करणे व पावसाळयातील पाण्याचा निचरा होणे आवश्यक आहे.

सदर ठिकाणी गटार बांधणे कामी पाहणी करुन खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | कामाचे नावं | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता हर्ष प्लाझा ते आरक्षण क्र. २२१ पर्यत गटार बांधुन स्लॅब टाकणे | रु.३४,८७,८५०/- |
| २ | भाईंदर (पुर्व) इंद्रलोक येथील आरक्षण क्र. २२१ ते रामदेव हाईटस् पर्यत एका बाजुस गटार बांधून स्लॅब टाकणे | रु. ३२,१२,५००/- |
| ३ | भाईंदर (पुर्व) इंद्रलोक फेस – २ क्रिष्णा गीता ते आरक्षण क्र. २२१ ते ऑरेंज हॉस्पीटल पर्यत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३६,७१,४५०/- |

वरील कामी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या "नविन गटारे/ नाले बांधकाम" या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता (साबां)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि.30/05/२०१४.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.0६** आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

उपरोक्त विषयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागात वार्षिक टँकर पुरवठा दर, जॉईंट फिटींग्ज व पंपिंग स्टेशन देखभाल दुरुस्ती तसेच विकासकामे करणेसाठी खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. सदर कामाच्या वार्षिक निविदा मागविणे गरजेचे आहे. तसेच महानगरपालिकेव्दारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| १ | महानगरपालिकेव्दारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे. | ५०,००,०००/- |
| २ | पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/दुरुस्तीसाठी मेकॅनिकल जॉईंट व फिटींग्ज पुरवठा करणेकामी वार्षिक दर मागविणे. | ५०,००,०००/- |
| ३ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ३० द.ल.लि. पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापूरबावडी) येथील पंपिंग स्टेशनच्या वार्षिक देखभाल, दुरुस्ती व चालविणे | ४२,९३,३००/- |
| ४ | अतिरीक्त २० द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ठाणे गायमुख जकात नाका येथे मुख्य घोडबंदर रस्तामध्ये १६०० मि.मी. व्यासाची १८ मि.मी. जाडीची मृदू पोलादी पाईप एच.डी.डी. (HDD) पद्धतीने छेदून त्यामधून १३५० मि.मी. व्यासाची मृदू पोलादी जलवाहिनी टाकणे. | ४९,८०,९३०/- |
| ५ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी ने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या साकेत येथील पंप गृहाकरीता मंजूर विद्युत जोडणी करणेकरीता ११ के.व्ही. फिडर बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ३६,९४,०००/- |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील सर्व्हे क्र. २३३ मधील उंच जलकुंभ तात्पुरत्या स्वरुपात पाणी वितरणाकरीता ५०० मि.मी. व्यासाची डी.आय.के-७ जलवाहीनी पुरविणे व अंथरणे | ४९,८४,८२०/- |

तरी वरील कामे अत्यावश्यक असल्याने आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : ८१९ २८२८.

## // गोषवारा //

**मा. स्थायी समिती दि. ३० /०५ /२०१४**

**प्रकरण क्र.०७ मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ठेका वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात (उदा. सामान्य प्रशासन विभाग, आरोग्य विभाग, वैद्यकीय आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, पाणी पुरवठा विभाग इ.) अत्यावश्यक विभागात मनपाच्या वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक नेमणेकामी जा.क्र./मनपा/वाहन/१८/२०१३-१४ दि. ३०/०४/२०१३ रोजी वार्षिक कार्यादेश देण्यात आला होता. सदर कार्यादेशाची मुदत दि.२९/०४/२०१४ रोजी संपलेली आहे. लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक २०१४ कामी आचारसंहिता लागू झाल्याने नवीन निविदा काढणे शक्य झाले नाही.

सन २०१४-१५ अर्थसंकल्पात अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षातंर्गत रु.३५,०००००/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीतुन ठेका वाहन चालक पुरवठा करणेकामी येणारा खर्च भागविणेत येणार आहे.

महानगरपालिकेच्या विविध विभागातील अत्यावश्यक सेवा तसेच इतर विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी वार्षिक निविदा मागविणेस मा. स्थायी समितीची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

उप-आयुक्त (वाहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

goshvara (theka vhan chalak purvatha)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा, दि.३० /०५ /२०१४**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ०८:- मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येथे कचरा हवारी करणे, आगीवर माती पसरविणे आदी कामी भाड्याने पोकलन,जे.सी.बी.,चेनड्रोझर,डंपर,टोरस भाड्याने घेणे व माती टाकणे इ. कामाची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात सद्यस्थितीत कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम पुर्णपणे बंद आहे. त्यामुळे शहरातील दैनंदिन साफसफाई विषयक कामातून निघणारा सुमारे ४०० ते ४५० मेटीक टन घनकचरा वाहतुक करून प्रकल्पाच्या लगत मोकळ्या जागेत टाकून पोकलन मशिन मार्फत हवारी करण्यात येत आहे. सदरची जागा ही डोंगराळ व कमी असल्याने दैनंदिन येणारा घनकचरा दररोज उंचावर नेऊन डंम्प करण्यात येत आहे. या कामी दररोज तीन ते चार पोकलन मशिन चालवून घनकचऱ्याची विल्हेवाट वेळीच लावणेत येत असुन याकामी प्रतीमाही नऊ ते दहा लक्ष खर्च अपेक्षित आहे.

शहरातील दैनंदिन साफसफाई कामातुन जमा होणा-या कचऱ्यामध्ये औद्योगिक क्षेत्रातील कचरा मिक्स असून केमिकल मिश्रीत असतो. त्यामुळे उष्णतेने सदर कचऱ्याला आग लागून धुर होत असल्याने आजुबाजूच्या गावातील रहिवाश्यांना गैरसोय होण्याची शक्यता असते. अशावेळी आगीवर माती टाकून पोकलन मशिनमार्फत पसरवून आग नियंत्रणात आणण्याकामी आवश्यकतेनुसार तातडीने माती मागविणे गरजेचे असते. सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या निविदेची मुदत ३१/०३/२०१४ रोजी पर्यंत संपलेली आहे. दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणुक २०१४ ची आचार संहितामुळे नविन निविदा मागविता आले नाही.

शहरातुन दैनंदिन साफसफाई विषयक कामातून निर्माण होणाऱ्या घनकच-याची विल्हेवाट वेळीच लावण्याच्या दृष्टीने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी वरील प्रमाणे कराव्या लागणा-या तसेच साफसफाई ही अत्यावश्यक सेवेत येत असल्याने, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी टाकण्यात येणारा दैनंदिन कचरा हवारी करणे कामी आवश्यक लागणारी पोकलन,चेनडोझर,जे.सी.बी.मशिन, डंपर, टोरस भाड्याने घेणे व माती खरेदी करणे गरजेचे आहे. मात्र सदरचा घनकचरा प्रक्रिया प्रकल्प स्थलांतर होणार असल्याने वरील प्रमाणे पोकलन, चेनड्रोझर, जे.सी.बी. मशिन, डंपर, टोरस भाड्याने घेणे व माती खरेदी करणे कामाच्या निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या रु. ५० लक्ष खर्चास मा. स्थायी समिती सभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

उप-आयुक्त (आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

F:\Raj\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Nafe safsafai - 2014-15.docx

(७२)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०५/२०१४

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ०९ :- उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता ठेका पध्दतीने स्त्री/पुरुष मजुर पुरवठा करणेकामी वार्षिक निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील विविध कामाकरीता ठेका पध्दतीने किमान वेतन कायद्याप्रमाणे मजुर पुरवठा करणेकामी **मा. वृक्ष प्राधिकरण समिती सभा ठराव क्र.12 दि.23/05/2013 अन्वये मंजूरी घेवुन दि.16/06/2013** रोजी **दै. दि फ्रि प्रेस जर्नल, दै. नवाकाळ** व ई-टेडरिंग (e-Tendring) प्रणालीद्वारे जाहीर निविदा प्रसिध्द करुन ठेका पध्दतीने मजुर घेण्याकामी **दि.17/06/2013 ते 27/06/2013** रोजी या कालावधीकरिता **निविदा प्रसिध्द** करण्यात आली होती, परंतु सदर कालावधीत **दोनच निविदा प्राप्त** झाल्यामुळे कमीत कमी तीन निविदा प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन सदर निविदेस **दि.01/07/2013 पर्यंत प्रथम मुदतवाढ** देण्यात आली होती. त्यानुसार **एकुण तीन निविदा प्राप्त** झाल्या होत्या. सदर कंपन्या निविदेतील **अटीशर्तींच्या पुर्तता करित नसल्यामुळे** मा. आयुक्त सो. यांनी **दि. 18/07/2013** रोजी **फेर निविदा** मागविण्यास **मंजुरी** दिली.

त्यानुसार **दि.25/07/2013** रोजी **दै. नवभारत व दै. मिड डे** या वृतपत्रात व ई-टेडरिंग (e-Tendring) प्रणालीद्वारे **दि.25/07/2013 ते दि.03/08/2013** या कालावधीकरीता जाहिर **फेर निविदा (प्रथम)** प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदेची अंतीम मुदत **दि.03/08/2013 रोजी पर्यंत** होती. सदर कंपन्या निविदेतील **अटीशर्तींच्या पुर्तता करित नसल्यामुळे** मा. आयुक्त सो. यांनी **दि.20/01/2014** रोजी **फेर निविदा** मागविण्यास **मंजुरी** दिली.

त्यानुसार दि.24/01/2014 रोजी दै. नवभारत, दै. मिड-डे व **e-Tendering** प्रणालीद्वारे **जाहीर फेरनिविदा (द्वितीय)** मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेची मुदत **दि.05/02/2014** रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत होती. त्यानुसार **दि.28/01/2014 ते दि.05/02/2014** या कालावधीत **एकुण चार निविदा प्राप्त** झालेल्या आहेत.

**1) मे. स्ट्रार कन्स्ट्रक्शन,**
**2) मे. कमल इंटरप्रायईजेस,**
**3) मे. जय श्रीकृष्ण ट्रान्सपोर्ट**
**4) सैनिक इंटलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या सन २०१३-१४ अर्थसंकल्पात **"मजूर पुरवठा"** या लेखाशिर्षाखाली रु.२.२५ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. ठेका मजूर पुरवठा निविदेस योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने व निविदेची मुदत दि.06/07/2013 रोजी संपत असल्याने, मा. स्थायी समिती ठराव क्र.39, दि.06/07/2012 अन्वये मंजूर केलेल्या दरानुसार एकूण १९० मजूर प्रती दिवस पुरवठा करण्यास मा. आयुक्त सो. यांचे मंजूरीने वेळोवेळी मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. अवलोकन होणेस विनंती.

वर नमुद प्रमाणे **04 प्राप्त निविदा** विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया प्राप्त झाल्या असुन सर्व निविदा धारकांच्या Technical Bid तपासणी बाबत दि. 12/02/2014 रोजी सदरची नस्ती मा. निविदा समिती यांचेकडे सादर करण्यात आली होती. त्यावेळेस निविदा समितीच्या बैठकीमध्ये मे. स्टार कन्स्ट्रक्शन व मे. जय श्री कृष्ण ट्रान्सपोर्ट यांनी सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा. लि. यांच्या अनुभव दाखल्याबाबत आक्षेप घेतल्याने मा. निविदा समितीने सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.

लि. यांनी दाखल केलेल्या अनुभव दाखल्याबाबत मा. विधी अधिकारी यांचे अभिप्राय घेणेबाबत विनंती केली. त्यानुसार विधी अधिकारी यांनी सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा. लि. यांचा अनुभव दाखला विचारात घेणेबाबतचे अभिप्राय दिले व त्यास मा. आयुक्त सो. यांनी दि.20/02/2014 रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दि.21/02/2014 रोजी सदर निविदेचे Financail Bid उघडुन तुलनात्मक तक्ता/विवरण पत्र तपशिल खालील प्रमाणे आहे.

| No. | Entity Description | STAR CANSTRUCION | JAI SHREE KRISHNA TRANSPORT | SAINIK INTELLIG-ENCE & SECURITY PVT. LTD. |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply of labour on contract basis according to Minimum Wages Act for Garden and Tree Authority Department in MBMC jurisdiction. (Period - 1 year) Date 01st January 2014 to 30th June 2014. | Rs.409.50 | Rs.416/- | Rs.441/- |
| 2. | Supply of labour on contract basis according to Minimum Wages Act for Garden and Tree Authority Department in MBMC jurisdiction. (Period - 1 year) Date 01st July 2014 to 31st December 2014. | Rs.423/- | Rs.423.57 | Rs.471/- |

निविदाधारकाने किमान वेतन कायद्याप्रमाणे मजुरांना दरमहा वेतन देणे बंधनकारक आहे व तसेच इतर सर्व प्रकारचे कर भरण्याची/अदा करण्याची जबाबदारी सर्वस्वी निविदाधारकाची आहे. उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद प्रमाणे मे. स्टार कन्स्ट्रक्शन यांची कमी दराची वार्षिक निविदा स्विकारण्यास मा. निविदा समितीने दि.24/02/2014 रोजी शिफारस केलेली आहे व त्यास मा. आयुक्त सो. यांनी दि.24/02/2014 रोजी मंजूरी दिलेली आहे.

मा. वृक्ष प्राधिकरण समितीने पारित केलेल्या ठरावामध्ये सन २०१४-१५ या वर्षाकरीता अर्थसंकल्पात **"मजूर पुरवठा"** या लेखाशिर्षाखाली रु.२.५० कोटी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. **मे. स्टार कन्स्ट्रक्शन** यांची **कमी दराची** वार्षिक निविदा स्विकारणेस मा. स्थायी समिती सभेची **आर्थिक व प्रशासकीय मान्यता** मिळणेस शिफारस आहे.

**मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने**

**उप-आयुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.३०/०५/2014

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ७० :- महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.117 (बगीचा/उद्यान) येथे Theme Park विकसित करणेकामीच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.117 (**बगीचा/उद्यान**) येथे Theme Park विकसित करणेकामी मा. महासभा ठराव क्र.29, दि.14/12/2012 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. मा.आयुक्त सो. यांनी दि.27/11/2013 रोजी फेरनिविदा मागविण्याबाबत निर्देश दिले. त्यानुसार दि.29/11/2013 रोजी दै. आफ्टरनून व दै. वृत्तमानस या वृत्तपत्रांत तसेच ई-टेंडरींग प्रणालीद्वारे जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार सदर कालावधीत **1)** मे. देव इंजिनिअर्स, **2)** मे. खुशबू एंटरप्राईजेस व **3)** मे. ओमकार इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स अशा एकूण **03** निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदर निविदांच्या Technical Bid तपासणेकामी मा. निविदा समिती समोर सादर केल्या असता Technical Bid तपासून सर्व निविदाधारकांच्या Financial Bid उघडणेबाबत मा. निविदा समितीने शिफारस केली असून त्यास मा. आयुक्त सो. यांनी दि.26/02/2014 रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर Financial Bid चा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Company Name | Estd Financial Limit | Deviation in percentage (use 0 for at par) | Quoted Rate | Quoted Rate in words |
|---|---|---|---|---|---|
| 1. | **DEV ENGINEERS** | **18367300** | **- 4** | **17632608** | **Rupees One Crore Seventy Six Lakh Thirty Two Thousand Six Hundred Eight Only** |
| 2. | KHUSHBU ENTERPRISE | 18367300 | 13.5 | 20846885.5 | Rupees Two Crore Eight Lakh Forty Six Thousand Eight Hundred Eighty Five And Five Lakh Paisa Only |
| 3. | OMKAR ENGINEERS AND CONTRACTORS | 18367300 | 14.4 | 21012191.2 | Ruepes Two Crore Ten Lakh Twelve Thousand One Hundred Ninety One And Two Lakh Paisa Only |

उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद प्रमाणे **मे. देव इंजिनिअर्स (L1)** यांची **कमी दराची निविदा** (-4%) स्विकारण्याच्या निर्णयाकरीता दि.26/12/2014 रोजी मा. निविदा समिती समोर सादर केली असता मा. निविदा समितीने **मे. देव इंजिनिअर्स (L1)** या निविदाधारकाबरोबर दर कमी करणेबाबत वाटाघाटी केल्या असता सदर निविदाधारकाने निविदेमध्ये भरलेले **(-4%) 4%** Below दर वाजवी असल्याने कमी करता येणार नाहीत असे चर्चेअंती म्हटले आहे.

सबब **मे. देव इंजिनिअर्स** (L1) यांची **कमी दराची निविदा** (-4%) 4% Below स्विकारण्यास मा. निविदा समितीने दि.26/02/2014 रोजी शिफारस केली आहे व त्यास मा. आयुक्त सो. यांनी दि.26/02/2014 रोजी मान्यता दिली आहे.

सन 2014-15 च्या अर्थसंकल्पात **"उद्याने व दुभाजक सुशोभिकरण करणे"** या लेखाशिर्षाखाली रु.800.00 लाख तरतूद करण्यात आलेली आहे. उक्त नमुद कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने**

उप-आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०५/२०१४

// गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( ११ ) :- निविदाना मान्यता देणे.

दि. १४/०२/२०१४ रोजी दै फ्रि प्रेस जरनल, दै. लोकसत्ता, दै. मिड डे, दै ठाणे वैभव या वृत्तपत्रात व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदाराने मुदतीत निविदा सादर केली आहे.

| अ.क्र. | टेंडर आय.डी | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. निविदा समिती बैठकीची शिफारस | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २१७०९ | घोडबंदर गाव रेतीबंदर ते मॉडेन झोपडपट्टी पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे.(दलित वस्ती सुधारणा) | रु. ४९,९५,२००/- | दि. ०७/०२/२०१४ | दि. २१/०३/२०१४ | दै फ्रि प्रेस जरनल, दै. लोकसत्ता दि. १४/०२/२०१४ | दि.१५/०२/२०१४ |
| | | **१. मे. महेश्वर बिल्डर्स** | **१६.६६ % कमी दराने** | | | | |
| | | २. मे. नागना इंटरप्रायझेस | ४.८% कमी दराने | | | | |
| | | ३. मे. श्री.सिव्हील इंन्फ्राप्रोजेक्टस् | १.८८ % जास्त दराने | | | | |
| | | ४. मे. विकास इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने | | | | |

वरील कामाच्या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता (साबां)
मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC 5 3-14 DK SG/2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

### मा. स्थायी समिती सभा दि.३० /०५ /२०१४.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. १२ :- निविदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात मुंबई महानगरपालिकेमार्फत मंजूर प्रति दिन १.५ द.ल.लि. पाणी उपलब्ध करून घेण्यासाठी व गोडदेव जलकुंभ परिसराची पाणी वितरण व्यवस्था सुधारणा करणेसाठी जलवाहिनी अंथरणे कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) भाईंदर (पुर्व) फाटक पंपिंग स्टेशन ते धर्म कांटा पर्यंत नविन जलवाहिनी टाकणे.
(अंदाजित रक्कम रू. ४९,९५,४००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **मे. मानस कन्स्ट्रक्शन** | ९.५०% जास्त दराने **वाटाघाटीअंती ७.००% जास्त दराने** |
| मे. देव इंजिनिअर्स | १४.००% जास्त दराने |
| मे. विंध्या ट्रेडर्स | १४.९९% जास्त दराने |

२) लोढा कॉम्प्लेक्स ते एम.आय.डी.सी. जलकुंभापर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.
(अंदाजित रक्कम रू.४५,११,१००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **मे. विंध्या ट्रेडर्स** | **१२.८६% जास्त दराने** |
| मे. देव इंजिनिअर्स | २३.००% जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ च्या कामाकरीता **मे. मानस कन्स्ट्रक्शन** अ.क्र. २ च्या कामाकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** यांचे प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३८ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

(९८)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ३०।०५।२०१४

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** :- ( 93 ) मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे.

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नांव / कामाचा दर | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईदर (पू.) प्रभाग क्र. ११ येथील मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या जागेवर सामाजिक सभागृह बांधणे. (आमदार निधी) | रु. ९,९९,०००/- | मे.कंचन कंन्स्ट्रक्शन कं | अंदाजपत्रकीय दराने |
| २ | उत्तन भाटेबंदर येथे गटारे व कॉंक्रीट रस्ते तयार करणे.(आमदार निधी) | रु. ९,९९,०००/ | मे.सुर्या इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ३ | मोर्वा उद्यान व तलावाचे सुशोभिकरण करणे (आमदार निधी) | रु. ९,९९,०००/- | मे.सुर्या इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ४ | मिरारोड (पू.) पुनम सागर मधील जॉगर्स पार्क मध्ये पक्या स्वरूपाची खेळणी पुरविणे. (आमदार निधी) | रु १२,९९,०००/- | मे.मुरकान इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ५ | मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वरसावे गाव येथील पदपाथावर ऊर्जा व दिवा बत्तीची सोय करणे. (आमदार निधी) | रु ९,९४,०००/- | मे. अे.के. इलेक्ट्रीकल इंजि.कं. | अंदाजपत्रकीय दराने |
| ६ | मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील डाचकूलपाडा येथील पदपाथावर ऊर्जा व दिवा बत्तीची सोय करणे. (आमदार निधी) | रु. ९,९४,०००/ | मे. अ.के. इलेक्ट्रीकल इंजि.कं. | अंदाजपत्रकीय दराने |
| ७ | मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील माशाचा पाडा येथील पदपाथावर ऊर्जा व दिवा बत्तीची सोय करणे. (आमदार निधी) | रु. ९,९४,०००/- | मे. अे.के. इलेक्ट्रीकल इंजि कं | अंदाजपत्रकीय दराने |
| ८ | भाईदर (प.) लालबहादूर शास्त्रीनगर येथे २० गाळे शौचलय पुर्नबांधणी करणे. (नगरसेवक निधी) | रु. २३,४२,०००/- | मे. एम.एस. इंटरप्रायझेस | दरपत्रकापेक्षा २.००% कमी दराने |
| ९ | प्रभाग क्र. ४६ मधील एम.एम.आर.डी.ए शौचालयापासून मांडवी पाडाकडे जाणारा उर्वरीत रस्ता डांबरीकरण करणे. | रु. १२,१०,९५०/- | मे. एम.एस. इंटरप्रायझेस | १४.[illegible] % कमी दराने |
| १० | प्रभाग क्र. ४६ मधील साईदर्शन टॉवर समोरील उर्वरीत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. १३,३२,७५०/ | मे. साळुंखे कंन्स्ट्रक्शन | दरपत्रकापेक्षा १०.०० % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | भाईंदर (पू.) प्रभाग क्र. १४ मधील चित्तोडगड ते कल्पना शिल्प पर्यंत गटार नविन बनविणे. | रु. ११,५५,८५०/- | मे. साळुंखे कंन्स्ट्रक्शन | दरवाटाघाटीनंतर १०.५% कमी दराने |
| १२ | भाईंदर (पू.) प्रभाग क्र. १४ मधील डी.जी. इंड. येथील रिलायन्स सबस्टेशन ते कचरा कुंडी पर्यंत गटार बनविणे. | रु. १०,८९,९००/- | मे. साळुंखे कंन्स्ट्रक्शन | दरवाटाघाटीनंतर १०.५% कमी दराने |
| १३ | भाईंदर (पू.) कनकिया येथील मा. महापौर व मा. आयुक्त निवास इमारतींची रंगरंगोटी व दुरुस्ती कामे करणे. | रु. १२,५०,३००/- | मे. एम.एस. इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर १३.०० % कमी दराने |
| १४ | भाईंदर (पू.) प्रभाग क्र. १३ मधील भाईंदर उद्योग, मिलन पॅलेस हॉलच्या मागे व स्वस्तिक इस्टेट येथील गटार बनविणे. | रु. ५,९८,७५०/- | मे.कंचन कंन्स्ट्रक्शन कं | अंदाजपत्रकीय दराने |
| १५ | प्रभाग क्र. २५ धावगी डोंगर येथील मांदले यांच्या घरापासून ते शौचालयापर्यंत सी.सी. रस्त्याचे बांधकाम करणे. | रु. ६,७४,५००/- | मे. श्रीकृपा इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराने |
| १६ | मिरारोड (पू.) स्व.इंदिरा गांधी रुग्णालयाच्या शवागृहातील शवपेटया वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. ९,५०,४००/- | मे.युटीलिटी इंटरप्रायझेस | |
| | | | | **UTILITY ENTERPRISES** |
| ***ITEM CODE*** | **DESCRIPTION** | ***Unit*** | **QTY** | **RATE PER UNIT PER MONTH** |
| 1 | Monthly Servicing and 4 Visit per month for complete checkup (4 Body Unit x 4 Nos.) | Nos. | 4 | 6500/- |

वरील कामांच्या निविदांना मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

**कार्यकारी अभियंता (सा.बां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**